# छात्र प्रबोधन

सौर श्रावण, शके १९३३ । वर्ष ११ अंक ११
मूल्य रुपये पंधरा

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी,
कृतिशीलता जोपासणारे मासिक !

विद्यार्थी विशेषांक







पाऊस थेंबांतला





# छात्र प्रबोधन

**सौर श्रावण, शके १९३३। वर्ष ११ अंक ११**

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै - ऑगस्ट १९९२)
२२९ वा अंक, वर्ष २० अंक १


ॐ

*इवली शल्ये रुपती खुपती*
*मात करू दे त्यांच्यावरती*
*प्रगल्भतेचे पंख देऊनी*
*ने ज्योतिर्जगतात*

## अंतरंग


२. **संवाद** - महेन्द्र सेठिया, पल्लवी, आयुषी, पूर्वा, सानिका

३. कथा... **मिशन पत्रव्यवहार** - कु. अंकिता आपटे

७. माहितीपर... **इको सिटी** - चि. श्रेयस जोगळेकर

९. **शब्दकोडे** - कु. चिन्मयी खेरडीकर

१०. कविता पानोपानी... **मोबाईल** - कु. नयन जगताप

**विज्ञानयुग** - चि. देवव्रत शिरोळकर

११. व्यक्तिपरिचय... **वेंकटरामन् रामकृष्णन् - एक विज्ञानमय जीवन** - कु. कल्याणी मराठे

१३. संस्था परिचय... **आदर्श सामाजिक प्रकल्प इंद्रायणी मनोविकास संस्था** - कु. आकांक्षा घाटोळ

१५. कला कौशल्य... **मुक्तहस्त चित्र** - कु. पूर्वा गुर्जर

१६. कथा... **सूड** - कु. सानिका समेळ, कु. पूर्वा गुर्जर

२०. कविता पानोपानी...

**आयुष्य हे असंच जगायचं असतं** - कु. गौतमी सडेकर

२१. प्रवास वर्णन... **माझी अविस्मरणीय सहल** - कु. मैत्रेयी मुळावकर

२३. कथा... **अज्ञात** - चि. ओंकार भाटवडेकर

२६. **दिवाळी अंक नोंदणी केंद्रे**

२८. सिंहावलोकन... **अकराव्या वर्षाचे**

मलपृष्ठ पद्य - **हाक तुझी परि मनी वसे...**- श्री. रामभाऊ डिंबळे

**याशिवाय -** करूया नवं काही- आगपेटीच्या काड्यांची संगीत वाद्ये (६), स्विंगिंग बॉल (८)


### मुखपृष्ठाविषयी

मुखपृष्ठावरील चित्र 'संकल्पना चित्र' या प्रकारातील आहे. निरनिराळे आकार एकत्रित काढून आणि विविध रंगसंगती साधून हे चित्र काढले आहे. या चित्रामध्ये 'विभक्त रंगसंगती' वापरली आहे.

**- चि. तुषार कुलकर्णी**


**संपादक, प्रकाशक, मुद्रक**
महेन्द्र सेठिया

**कार्यकारी संपादक**
जयश्री काटीकर

**संपादक मंडळ**
शैलजा देशमुख, नीलिमा करमरकर, कांचनगंगा गंधे, आश्लेषा महाजन, दत्ता श्री. टोळ

**विद्यार्थी संपादक मंडळ**
कु. पल्लवी गाडगीळ, कु. पूर्वा गुर्जर, कु. आयुषी खाडिलकर, कु. सानिका समेळ

**मुखपृष्ठ :** चि. तुषार कुलकर्णी

**मलपृष्ठ:** कु. संयुक्ता रावत, कु. मधुरा रेडीज

**आतील चित्रे :** कु. सानिका समेळ, कु. पूर्वा गुर्जर, कु. आद्या अभ्यंकर, कु. इरावती आनंद



**संपर्क पत्ता**
**छात्र प्रबोधन,** ज्ञान प्रबोधिनी,
५१०, सदाशिव पेठ, पुणे - 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९


**ई-मेल**
jpchhatra@rediffmail.com

**संकेतस्थळ**
www.chhatraprabodhan.org



**वार्षिक वर्गणी ₹ १८०/-**
**द्वैवार्षिक - ₹ ३४०/-**
**त्रैवार्षिक ₹ ५००/-**
**दशवार्षिक - ₹ १,५००/-**
**या अंकाची किंमत : ₹ १५**
पुण्याबाहेरील धनादेशासाठी ₹ २० जादा
घरपोच दिवाळी अंकासाठी प्रतिवर्षी ₹ ४०जादा

# संवाद



***प्रिय जबाबदार प्रबोधकांनो,***

*अकरावीतल्या चार युवतींनी खास तुमच्या साहित्य-कलाकृतींनी नटलेल्या या अंकाची संपादकीय जबाबदारी घेतली याबद्दल त्यांचे मनापासून कौतुक ! एखाद्या कामाची जबाबदारी घेणं म्हणजे काय काय करायला लागतं? जे काम स्वत:हून स्वीकारलेलं असतं किंवा जे काम आपल्याला कोणीतरी करायला सांगितलेलं असतं ते **काम सर्वप्रथम समजावून घेणे** हे जबाबदार असण्याची पहिली पायरी आहे. कामाचा हेतू काय? उद्दिष्ट काय? काम पूर्ण झाले असे केव्हा म्हणणार? कामाचे तपशील, काही विशेष आग्रह, मनुष्यशक्ती, अर्थशक्ती अन्य साधनसामुग्री किती उपलब्ध आहे, किती मिळवायला लागेल, कामात किती व कशाकशाचं स्वातंत्र्य आहे इ. बाबत काम सांगणाऱ्याकडून शक्य तेवढी स्पष्टता सुरुवातीलाच आली म्हणजे जबाबदारीची जाणीव होते. काम पूर्ण होण्यासाठी किती वेळ द्यावा लागेल, कोणाकोणाचे साहाय्य मिळवावे लागेल, काय नवीन शिकावे-अनुभवावे लागेल. इ. गोष्टी हळूहळू स्पष्ट व्हायला लागतात.*

*समजून घेतलेल्या कामाचे नियोजन करणे व त्यानुसार मनापासून, प्रसन्नचित्ताने व **वेळेत ते पूर्ण करणे,** काम करताना आलेल्या अडचणींवर उपाय शोधणे, काम अर्धवट सोडून न जाणे, काम पूर्ण होण्यासाठी आवश्यकतेनुसार अनेकांची मदत घेणे, काही चुका झाल्या तर त्या मान्य करून-समजून घेऊन-दुरुस्त करणे, कामामध्ये नावीन्य अन् उत्तमता कशी येईल यासाठी स्वत:हून प्रयत्न करणे, गरजेनुसार प्रसंगावधान राखणे हे जबाबदारपणाचे दुसरे लक्षण!*

*आणि असे पूर्ण झालेल्या कामाचे, ज्यानी काम सांगितले त्यांना अधूनमधून व **काम पूर्ण झाल्यावर निवेदन करणे,** सांगणे हे जबाबदारपणाचे तिसरे लक्षण ! अशा तिन्ही गोष्टी केल्या की त्यात तुम्ही काम जबाबदारीने पूर्ण केले असे सर्वजण म्हणतात. त्यातून जबाबदारी घेण्याचा तुमचा उत्साह वाढतो. अशी जबाबदारी घेऊन काम करण्यातून खूप शिकायला मिळते अन् आत्मविश्वासही वाढतो. इतरांचा आपल्यावरचा विश्वास वाढतो. त्यातून अधिक मोठ्या जबाबदाऱ्या आपल्यावर नि:शंकपणे सोपविल्या जातात. त्यातच खऱ्या अर्थाने 'मोठ्ठं' होण्याची सुरुवात आहे, असं मला वाटतं.*

*घरातली व शाळेतली छोटी-मोठी कामे जबाबदारीपूर्वक स्वीकारणे (गणेशोत्सव ही यासाठी एक चांगली संधी आहे), 'छात्र प्रबोधन'तर्फे जाहीर केलेल्या जोडीकार्य योजना, प्रकल्प स्पर्धा, सादरीकरणाची व हस्तलिखिताची स्पर्धा, विद्यार्थी संपादक मंडळ यांमध्ये सहभागी होणे यातून तुमच्यातला जबाबदारपणा वाढायला नक्कीच मदत होईल. तुम्ही अधिकाधिक जबाबदार होण्यासाठी तुम्हाला मनापासून शुभेच्छा !*

**सस्नेह तुमचा,**

**(महेन्द्र सेठिया)**

***मनोगत,***

*दहावीच्या भल्या मोठ्या सुट्टीत काय करावे असा विचार करत असतानाच एके दिवशी जयश्रीताईंनी आम्हाला 'काम करायला आवडेल का?' असे विचारले. काय काय करावं लागत असेल? किती वेळ लागेल? असे प्रश्न मनात होतेच, पण काम करण्याची उत्सुकताही होती. म्हणूनच आम्ही ताईंना 'हो' म्हणालो.*

*काम सुरू झाल्यावर साहित्याचे विषय ठरवताना ह्याच वर्षीचा मागचा एक अंक वाचनात आला. त्यात हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय वन वर्ष' व 'आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र वर्ष' आहे, हे कळले. मग या महिन्यातले अजून काही दिनविशेष बघितले. त्यानुसार अंकातल्या काही विषयांची मांडणी करता येईल का, हे बघितले. वनवर्षानिमित्त 'इको सिटी', रसायनशास्त्र वर्षानिमित्त नोबेल विजेते 'डॉ. वेंकटरामन् रामकृष्णन्' यांचा व्यक्तिपरिचय व स्वातंत्र्यदिनानिमित्त सामाजिक काम करत असलेल्या 'इंद्रायणी मनोविकास संस्थे'चा परिचय हे विषय नक्की केले.*

*या दोन महिन्यांत अंक करताना आम्हाला खूप नवीन गोष्टी, शिकायला मिळाल्या. जसे, कोणतेही गटकार्य करताना वेळ व काम यांचे नियोजन करणे, एखादे मत गटात पटवून देणे किंवा इतरांचे मत पटवून घेणे, नवीन व्यक्तींशी संपर्क साधणे.इ. असेच विविध अनुभव तुम्हीही घ्यावेत यासाठी 'छात्र प्रबोधन' विविध स्पर्धांचे आयोजन करत असते. तुम्हीही त्यात अवश्य सहभागी व्हायला हवे आणि आपल्या अनुभवांच्या साठ्यात वाढ करायला हवी. असे आम्हाला मनापासून वाटते. अंकाबद्दलच्या तुमच्या प्रतिक्रिया आम्हाला जरूर कळवा.*

**– पल्लवी, आयुषी, पूर्वा, सानिका**



**प्रायोजक - डॉ. कीर्ती आपटे, येरवडा, पुणे ६**

# मिशन पत्रव्यवहार

**कु. अंकिता आपटे**


या वर्षी शिक्षणखात्याकडून सगळ्या शाळांना शाळेत वेगवेगळ्या क्लब्स्‌ची (मंडळांची) स्थापना करण्याचा आदेश आला. त्यामुळे शाळेत 'शांता शेळके साहित्य क्लब', 'पु. ल. देशपांडे सांस्कृतिक क्लब', 'सर सी. व्ही. रामन विज्ञान क्लब' असे बरेच क्लब्स् स्थापन करण्यात आले. पूर्वा 'महाराणी लक्ष्मीबाई इतिहास क्लब' ची सदस्या होती आणि उपाध्यक्षाही. त्या सगळ्या क्लब्स् तर्फे वर्षभर वेगवेगळे कार्यक्रम होणार होते. प्रत्येक क्लबला आपलाच कार्यक्रम वरचढ व्हावा असं वाटणं अगदी साहजिक होतं.

क्लबच्या कार्यक्रमासाठी 'सेलिब्रिटीज' ना बोलावणं ही तर एक फॅशनच झाली होती. पूर्वालाही आपल्या इतिहास क्लबचा फार अभिमान होता. 'क्लबसाठी काहीतरी भव्यदिव्य करायचं,' असा तिने निश्चय केला.

या साऱ्या धामधुमीत पहिलं सत्र संपलं, परीक्षा झाल्या आणि सुट्टी लागली. इतके दिवस चालू असलेली क्लब्स्‌मधली चुरस, चढाओढ सगळ्याजणी विसरल्या आणि सुट्टी 'एन्जॉय' करायला लागल्या; पण पूर्वाच्या मनात मात्र इतिहास क्लबतर्फे एक सुंदरसा आणि मस्त माहिती देणारा कार्यक्रम कसा करायचा, हाच विचार घोळत होता.

इंग्लिश भाषा सुधारण्यासाठी पूर्वा नेहमी इंग्लिश चॅनेल्स बघायची. त्यातल्या एका कार्यक्रमात एकदा तिला जर्मनीच्या एका इतिहास संशोधकाबद्दल माहिती मिळाली. त्यांचं नाव सर रुडॉल्फ बेक्केनबोवर' होतं. त्यांनी हरप्पन, ग्रीक, रोमन, मिसापोटेमियन यांसारख्या प्राचीन संस्कृतींबद्दल बहुमोल संशोधन केलं होतं. ग्रीक संस्कृतीबद्दलच्या अभ्यासात तर त्यांनी विशेष प्रावीण्यही मिळवलं होतं. प्राचीन ग्रीकांनी वापरलेली भांडी, दागिने, नाणी यांचा अवाढव्य संग्रह त्यांच्याकडे होता. आजवर झालेल्या अनेक उत्खनन कामांत त्यांनी भाग घेतला होता. त्या सगळ्या संस्कृतींचे प्राचीन अवशेष असणाऱ्या अतिशय दुर्मिळ आणि अनमोल अशा वस्तूंचा जगातील सर्वात मोठा साठा सर रुडॉल्फ बेक्केनबोवरकडेच होता.


अशा या 'भारी' माणसाबद्दल पूर्वाला फारच कुतूहल वाटलं. तिने नेटवरूनही त्यांची काही अधिक माहिती मिळवली. त्यांच्याबद्दल तिचा आदर वाढू लागला. इतिहासात



**कपिल सिब्बल सरांना भेटून पूर्वा दिल्लीहून परतली. यादीप्रमाणे तिने पुन्हा 'मिशन पत्रव्यवहार' चालू केला आणि काही जणांना पत्रं लिहिली. लोकांशी पत्रातून संवाद साधणं, परिचय वाढवणं हा जणू तिचा छंदच होता ! त्यांच्या उत्तरांची वाट बघताबघता सुट्टी संपली आणि शाळा सुरू झाली.**

---

त्यांनी केलेल्या संशोधनाबद्दल आणि त्यांच्याबद्दल आपल्याला वाटणारा आदर त्यांना आपण कळवावा असं तिला वाटलं मग काय... 'पत्रसम्राज्ञी पूर्वाराणी' हातात कागद-पेन घेऊन बसल्या आणि मनातले सगळे विचार तिने पत्रात उतरवले. त्याचबरोबर त्यांच्या



कामाबद्दल व्याख्यान देण्यासाठी तिच्या शाळेत येण्याची विनंतीही त्या पत्रात तिने केली.

इतक्या व्यस्त व्यक्तीकडून आपल्याला उत्तर येईल की नाही याबद्दल तिला थोडी शंकाच होती. आणि शाळेत व्याख्यानासाठी येणं हे तर तिला अशक्यच वाटत होतं. कारण एक जगद्विख्यात इतिहासतज्ज्ञ परदेशातून एका इटुकल्या शहरातल्या पिटुकल्या शाळेत एका चिमुरड्या पोरीच्या विनंतीवरून व्याख्यानासाठी येतील, ही कल्पनाच मुळी विचित्र वाटणारी होती.

पण कपिल सिब्बलसारख्या माणसानेही आस्थेवाईकपणे तिला उत्तर पाठवलं असल्याने तिच्या मनात एक आशेचा किरण होता.

शाळा सुरू झाल्या, तरी उत्तर काही आलंच नाही. इतर क्लब्स्तर्फे या कवीचं व्याख्यान, त्या अभिनेत्याला बोलावून त्याचा कार्यक्रम, हे सगळं पुन्हा चालू झालं.

देशपांडे सर पूर्वाला म्हणाले, ''पूर्वा, इतर क्लब्स्चे जोरदार कार्यक्रम सुरू झाले आहेत. आपल्या क्लबचा कधी आणि कसा करायचा कार्यक्रम? तू डॉ. बेक्केनबोवरना पत्र ४लिहिलंयस, हे माहित आहे मला; पण आपण आपलीही तयारी एकीकडे सुरू करूयात.''

पूर्वालाही हळूहळू खात्री पटली की आता डॉ. बेक्केनबोवर यांचे उत्तर काही येणार नाही. शाळा सुटली. पूर्वा घरी निघाली. पण घरी येतानाही 'आता काय करायचं?' हाच विचार तिच्या मनात घोळत होता आणि याच विचारात तो दिवस संपला.

दुसऱ्या दिवशी पूर्वा 'सर ऽ ऽ ऽ सरऽ ऽ ऽ!' म्हणत स्टाफरूममध्ये पळत आली. तिने एक पत्र देशपांडे सरांच्या हातात दिलं. सरांनी ते पत्र वाचलं आणि ते चटकन् उठून उभे राहिले. टाळी वाजवत आनंदाच्या भरात ते जोरात ओरडले, ''महाराणी लक्ष्मीबाई इतिहास मंडळाचा...''

पूर्वानेही मोठ्या उत्साहाने प्रतिसाद दिला, ''विजय असो !!''

देशपांडे सर त्या पत्राचं जाहीर वाचन करू लागले. 'डियर पूर्वा' हे वाचताना मिश्किलपणा आणि कौतुक यांचं मजेदार मिश्रण असलेली एक नजर आपल्या चष्म्यातून त्यांनी पूर्वावर टाकली. त्यानंतर ते पुढे वाचू लागले...

*"I was pleasantly surprised to receive such a wonderful letter from a little girl like you.*

*I am happy that I can attend your school function to be held in the month of December as I am traveling to Delhi for a conference. Will it be convenient for you?*

*I greatly appreciate your hobby of letter writing. Please let me know after you finalise the date."*

*With love*


**प्रा. - व्ही. व्ही. आर्किटेक्ट्स, प्रा. लि. पुणे**

पत्र वाजून संपताच सर आणि पूर्वा जवळजवळ धावतच मुख्याध्यापिकांकडे गेले. त्यांना ही बातमी सांगितली आणि लगेचच शाळेच्या चेअरमननाही फोन लावला. १०-१५ मिनिटांतच चेअरमन सरांची गाडी शाळेच्या कंपाऊंडमध्ये येताना दिसली. या सगळ्यांशी कार्यक्रमाच्या तारखेबाबत पूर्वाने चर्चा केली आणि नक्की तारीख ठरवली. सर रुडॉल्फनी पत्रात आपला मोबाईल नंबर दिलाच होता. तारीख नक्की होताच पूर्वाने त्यांना ती तारीख कळवून टाकली.

आता सुरू झाली जय्यत तयारी. शाळेची आणि पूर्वाचीही! सर रुडॉल्फना मराठी बोलता येत नव्हतं. ते इंग्रजीतच बोलणार हे उघडच होतं. त्यामुळे सर रुडॉल्फ आणि विद्यार्थी यांच्यामध्ये दुभाषक म्हणून कोण काम करणार? हा प्रश्न पूर्वाने लगेच सोडवला.

कपिल सिब्बल सरांच्या बैठकीत भाषण करण्यासाठी जेव्हा ती गेली होती तेव्हा आईकडून अस्खलित इंग्रजी तिने शिकून घेतलं होतंच. त्यामुळे दुभाषिकेचं काम तिने स्वत:वर घेतलं. एकदा सर रुडॉल्फनी आपण कॉम्प्यूटरवर सादरीकरण करणार असल्याचं सांगितलं. त्यामुळे आपल्या शाळेचा प्रोजक्टर, कॉम्प्यूटर, पडदा हे सारं ठीकठाक आहे की नाही हे तपासायचं गरजेचं झालं. या साऱ्या गोष्टी तपासून झाल्या आणि बिघडलेल्या गोष्टी दुरुस्तही करून घेण्यात आल्या. या साऱ्याच गोष्टीत पूर्वाने फारच उत्साहाने पुढाकार घेतला.

ट्रान्सलेटरच्या कामासाठी इंग्लिशमधले काही विशिष्ट शब्द फक्त इतिहासविषयक बोलतानाच वापरले जातात, ते तिने जाणून घेतले- समजावून घेतले आणि त्यांना मराठी पर्यायी शब्दही शोधून काढले. अखेर तो दिवस उजाडला.

३ वाजता कार्यक्रम सुरू होणार होता आणि बरोबर अडीचच्या ठोक्याला दिलेल्या वेळी सर रुडॉल्फ शाळेत हजर होते. सुरुवातीला चेअरमनशी, मुख्याध्यापकांशी आणि पूर्वाशी गप्पा मारून झाल्या आणि मग ते सगळेजण कार्यक्रमाच्या ठिकाणी जायला निघाले. तिकडे जाताना सर रुडॉल्फनी पूर्वाला विचारलं.

"Poorva, what is the word for 'hi friends' in your language, Marathi?"

आणि पूर्वाने तत्परतेने त्यांना उत्तर दिलं. त्या साऱ्यांनी कार्यक्रमाच्या हॉलमध्ये प्रवेश केला आणि सगळीकडे शांतता पसरली. स्वागतगीत, दीपप्रज्वलन, पुष्पगुच्छ अर्पण, प्रास्ताविक इत्यादी कार्यक्रम अगदी यथायोग्य झाले. निवेदिका म्हणाली, ''आता मी आपले प्रमुख पाहुणे सर रुडॉल्फ बेक्केनबोवरना विनंती करते की त्यांनी आपल्या भाषणाला सुरुवात करावी.''

भाषणाआधी कॉम्प्यूटर, स्क्रीन यांची पुन्हा एकदा तपासणी झाली.

त्यानंतर सर रुडॉल्फ माईकसमोर येऊन उभे राहिले. पूर्वासुद्धा ट्रान्सलेटरचा पवित्रा घेऊन सज्ज झाली आणि सर रुडॉल्फच्या तोंडून शब्द उमटले,

''माझ्या प्रिय मैत्रिणींनोऽ...'' हे शब्द ऐकताच विद्यार्थिनींनी शाळेचा हॉल टाळ्यांनी दुमदुमून सोडला. टाळ्यांचा हा गजर पूर्वाच्या मनात शेकडो फुलं फुलवून गेला. यानंतर भाषण सुरू झालं.

सर रुडॉल्फ यांच्या भाषणात अशी काही जादू होती की थोड्याच वेळात त्यांनी ऐकणाऱ्या विद्यार्थिनींच्यात आणि आपल्यात एक अतूट दुवा साधला. मोठे मोठे, अवघड शब्द न वापरता ते मस्त खुल्या, सोप्या भाषेत बोलत असल्याने पूर्वाचं ट्रान्सलेशनचं काम खूप सोपं झालं. सर रुडॉल्फची भाषणाची शैली आणि भाषणात त्यांनी आणलेली रंजकता यामुळे मुली अजिबात कंटाळल्या नाहीत. एक-दीड तास कसा नि कधी गेला ते कुणाला कळलंसुद्धा नाही. कॉम्प्यूटरवर सादरीकरणातून सर रुडॉल्फनी मुलींना हरप्पन, ग्रीक, मिसापोटेमियन, रोमन या सगळ्या संस्कृतींबद्दल अनेक आश्चर्यकारक, अद्भुत गोष्टी सांगितल्या आणि दाखवल्याही! एकूण काय? या संस्कृतींची एक अनोखी सफरच विद्यार्थिनींनी अनुभवली.

त्यांनरत आभारप्रदर्शनाने कार्यक्रम संपला. कार्यक्रम संपल्याबरोबर सर रुडॉल्फची स्वाक्षरी

घेण्यासाठी त्यांच्याभोवती मुलींचा भला मोठा घोळका जमला. त्यानंतर सर रुडॉल्फनी सर्वांचा निरोप घेतला. तो दिवस शाळेतल्या प्रत्येक मुलीसाठी अविस्मरणीय होता.

या साऱ्या गडबडीनंतर शाळा पुन्हा नेहमीप्रमाणे सुरू झाली. पुढे जानेवारीत झालेल्या स्नेहसंमेलनात दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांमध्ये मुख्याध्यापकांनी 'सर्वोत्कृष्ट क्लब' या नव्या पुरस्काराचा समावेश केला. हा पुरस्कार जाहीर करताना त्या म्हणाल्या, '' या वर्षीचं सर्वोत्कृष्ट क्लब आहे -''

काय असेल ते नाव? सगळ्या मुलींची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. आणि मुख्याध्यापिकांनी मोठ्या आवाजात ते नाव जाहीर केलं,

''आणि यावर्षी सर्वोत्कृष्ट क्लबचा 'ताज' मिळवणारा क्लब आहे, 'महाराणी लक्ष्मीबाई इतिहास मंडळ!' अभिनंदन!''

बक्षीस स्वीकारण्यासाठी देशपांडे सर पूर्वालाही व्यासपीठावर घेऊन गेले आणि आपलं मनोगत व्यक्त करताना त्यांनी पूर्वाचं अगदी भरभरून कौतुक केलं. 'विजय असो' ची घोषणा सभागृहात पुन्हापुन्हा दुमदुमत राहिली.

या साऱ्या धामधुमीनंतरअखेर वार्षिक परीक्षा जवळ आल्या. या मधल्या काळात पूर्वाने सर रुडॉल्फशी पत्रव्यवहार सतत चालू ठेवला होता. 'महाराणी लक्ष्मीबाई इतिहास मंडळा'ला सर्वोत्कृष्ट क्लबचा पुरस्कार मिळाल्याचे तिने सर रुडॉल्फना कळवलेही होते आणि ते दोघं जिवलग 'पत्रमित्र' झाले होते.

***

**कु. अंकिता आपटे** (इ. १० वी)
समाधान, प्लॉट नं. ८४,
राणी चन्नम्मा नगर, बेळगाव,
कर्नाटक 590006

---


**करूया नवं काही**

## आगपेटीच्या काड्यांची संगीत वाद्ये

**साहित्य** : जाड पुठ्ठे, कात्री, डिंक, आगपेटीच्या काड्या, लाल किंवा काळ्या रंगाच्या टिकल्या, जाड धागा, छोट्या बांगड्या इ.


**कृती** : सर्वप्रथम आपण तबला बनवूया. त्यासाठी प्रथम जाड पुठ्ठे घेवून त्याची तीन वर्तुळे कापावीत. त्यातील दोन वर्तुळे समान आकाराची तर तिसरे दोघांच्या तुलनेत मोठ्या आकाराचे असावे (आ. १). तिन्ही वर्तुळांना मध्यभागी छिद्रे करावीत. त्यानंतर त्या छिद्रांतून एक जाड काडी घालावी (आ. २). आगपेटीच्या काड्या मधल्या वर्तुळावर चिकटवाव्यात. त्या चिकटविताना आगपेटीचा गुल असलेला भाग वरच्या बाजूने चिकटवावा व खालील भाग मधल्या वर्तुळास चिकटवावा (आ. ३).

हीच कृती तबल्याच्या खालील बाजूस करावी. वर्तुळामध्ये घातलेली काडी काढून घ्यावी व वर्तुळाकार झालेल्या छिद्रांवर लाल किंवा काळी टिकली चिकटवावी. ही टिकली म्हणजे तबल्याची शाई! छोट्या बांगडीवर जाड धागा गुंडाळून तबल्याखालील रिंग तयार करावी. हीच कृती ढोलकी व डग्गा यांसाठी करावी. बांगडीच्या रिंग्ज् तबला व ढोलकी खाली ठेवाव्यात. ही वाद्ये एक छोटासा डायस करून त्यावर चिकटवावीत. ही वाद्ये पाहणाऱ्यांचे लक्ष वेधून घेतील.


आ. १


आ. २



आ. ३



– **अक्षय बोर्डे** (इ. १० वी)
गोकुळ कॉलनी, अकोला



प्रा. - श्री. अजित भिडे (इव्हेंट मॅनेजर) पुणे



# इको सिटी

चि. श्रेयस जोगळेकर

पर्यावरण हा विषय आज चर्चेचा बनला आहे. आज पाहावे तिथे पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी अनेक चळवळी उभ्या राहात आहेत. खरोखर आज पर्यावरणाचा ऱ्हास इतका का वाढला असेल, त्यामागची कारणे काय, हे जाणून घेणे प्रथम महत्त्वाचे आहे.

अशा प्रकारे पर्यावरणाचा प्रचंड ऱ्हास वाढतच आहे. त्याचे परिणाम तर आपण सर्वच त्सुनामी, भूकंप यांच्या रूपाने अनुभवतो. यावर काहीतरी उपाययोजना करणे गरजेचे होते. त्यासाठी सर्व देशांनी एकत्र येऊन 'Go Green' नावाची चळवळ उभी केली. त्याचबरोबर Save tigers,



'save forests' अशा काही चळवळी आज जागतिक पातळीवर उभ्या राहत आहेत. परंतु, याचबरोबर एक अभिनव कल्पना उदयास आली. या आधुनिक कल्पनेचे नाव आहे, इको सिटी (Eco city) 'इको सिटी' ही संज्ञा प्रथम रिचर्ड्स् याने १९८७ साली एका पुस्तकात वापरली. त्यात त्याने याची व्याख्या 'उज्ज्वल भवितव्य असणारे शहर' (City of Healthy Future) अशी केली. नंतर इंग्लंड मध्ये (यू.के.) सरकारने १६ जुलै २००९ रोजी चार शहरे प्रथम इको सिटी म्हणून घोषित केली. व्हाईटहिल बॉर्डन, सेंट ऑस्टेल, रॅकहीथ

माणूस पूर्वीपासून निसर्गावर अवलंबून आहे. अगदी आदिम काळापासून माणसाने लाकूड उपयोगात आणले आहे. सरपणासाठी लाकूड मोठ्या प्रमाणावर वापरले जाई. मग त्याचे प्रदूषण होत नसेल? नक्कीच होय. पण त्याचे प्रमाण मात्र अगदी नाममात्र होते. औद्योगिक क्रांतीनंतर शहरीकरणास सुरुवात झाली. जैविक इंधनांऐवजी जीवाश्म इंधने वापरात आली. त्यांचा अमाप वापर केला जाऊ लागला. त्यांचा धूर व विषारी वायुंच्यामुळे होणाऱ्या प्रदूषणाने पर्यावरणाच्या ऱ्हासाचे प्रमाण खूप वाढले. तसेच इमारतींसाठी अमाप वृक्षतोड केली गेली. त्यामुळे कार्बन डायऑक्साईड चे शोषण (Absorption) थांबले व जागतिक तापमानवाढीसही चालना मिळाली.

आणि उत्तर-पश्चिम (वायव्य) बायसेस्टर. शहरीकरण ही काळाची गरज आहे. त्यामुळे सर्व लोकांना रोजगार निर्मितीचे क्षेत्र उपलब्ध होते. त्यामुळे जरी प्रदूषण जास्त होत असले तरी, शहरीकरण थांबवणे अशक्य आहे. मात्र अशीच शहरे पर्यावरणास अनुकूल बनवली, तर शहरीकरणही थांबणार नाही व पर्यावरणाचे संवर्धनही करता येईल. अशा प्रकारे इको सिटी ने दुहेरी हेतू साध्य करता येतात. अशा शहरांमध्ये सर्व मोकळ्या जागा व इमारतींवरही वृक्ष लागवड केली जाते. या शहरांमध्ये एकमेकांशी संवाद साधणे सोपे असते. संदेशवहन व इतरत्र जाण्यासाठी केवळ पायी व सायकलचा उपयोग करण्यास परवानगी असते. बायोगॅस सारख्या माध्यमांद्वारे वीजनिर्मिती, स्वयंपाकघरात लागणारे इंधन म्हणून वायू, खत इत्यादी बहुद्देश साध्य केले जातात.

Vertical Gardens हे या शहरांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. उद्याने व बागा इमारतींवर स्थापणे हे आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे शक्य झाले आहे. या बागांची खास निगराणी नियमित केली जाते. यांची काही खास वैशिष्ट्ये आहेत : १. बागांना लागणारी जागा वाचते. २. इमारतींचा देखावा बदलतो व शोभाही वाढते. ३. या वनस्पतींना कीड व रोगांचा जास्त धोका नसतो. ४. ऑफिसेस मध्ये लावल्यास त्यांचीही शोभा वाढते. ५. संपूर्ण इमारतीचे तापमान थंड राहते. ६. प्राणवायूचा मुबलक पुरवठा होतो व कार्बन डायऑक्साईड चे प्रमाण घटते.

या शहरांमध्ये विनामृदेची शेती केली जाते. माती शिवाय केवळ पाणी, पोषक द्रव्ये व सेंद्रिय पदार्थांच्या मदतीने विविध पिके घेतली जातात. परंतु अशा इको सिटीची माहिती संपूर्ण जगाला अजून झाली नाही. ती करून देणे आवश्यक आहे. कारण इतकी प्रचंड लोकसंख्या असणाऱ्या भारतात ही कल्पना रुजवणे एक मोठे आव्हानच आहे. जर शासनाने ही संकल्पना भारतातील शहरांत वापरली, तर नक्कीच प्रदूषणाचे प्रमाण कमी होईल; परंतु ही कल्पना गांभीर्याने घेणे गरजेचे आहे. भारतीय संशोधकांना आज यावर अधिक संशोधन करण्याची गरज आहे. जर संपूर्ण भारतात व जगभरात या अभिजात कल्पनेचा उपयोग झाला, तर नक्कीच आपण प्रदूषणाचे प्रमाण कमी करू शकतो.

***

**चि. श्रेयस जोगळेकर** (इ. ११ वी)
स्वामीपुरम्, सी विंग,
२१६० बी, सदाशिव पेठ,
पुणे 411030

---

**करूया नवं काही**

# Swinging Ball



**साहित्य** : मोठा फुगा, वर्तमानपत्र, स्केचपेन, जलरंग, पाणी, फेविकॉल, प्लॅस्टर ऑफ पॅरिस इ.

**कृती** : प्रथम फुगा मोठा फुगवून घ्या. वर्तमानपत्राचे मध्यम आकाराचे तुकडे फाडा. ते पाण्यात अर्धा-एक मिनिट भिजवत ठेवा. तुकड्यांमधील पाणी पूर्णपणे पिळून न घेता फुग्यावर त्या तुकड्यांचा थर लावा. फुग्याचा गाठीजवळील भाग वगळून असे २ ते ३ थर द्या. नंतर तो फुगा १ ते २ दिवस कडक उन्हात वाळू द्या. कागदांचा थर पूर्णपणे वाळल्यावर आतील फुगा फोडा. फुग्याच्या गाठीजवळील वरचा भाग हवा तसा कापून घ्या. आपल्याला आवडेल त्या रंगात कागदाचा थर रंगवा आणि त्यावर नक्षीकाम करा.


एका भांड्यात पाणी, प्लॅस्टर ऑफ पॅरिस व फेविकॉलचे मिश्रण तयार करा आणि ते कागदाच्या थराच्या आतील भागात सावकाश ओता.

आता तुमचा Swinging Ball तयार झाला. तुम्ही कितीही जोरात मारलं तरीही बॉल पुन्हा सरळ होईल.

(संकलन)


प्रायोजक - डॉ. विनायक देसूरकर, पुणे

# शब्दकोडे



**आडवे शब्द -**

१. प्रचंड, खूप मोठे
५. नसून भासणारे पाणी
७. मान ठेवणे, आदर
८. गटार
९. हात
११. एका प्रकारचे औषध
१३. लढाऊ विमानांचा एक प्रकार
१४. तयारी
१५. हद्द
१६. लक्ष
१८. लहान (वयाशी संबंधित)
२१. खिल्ली
२३. वागण्या बोलण्याची एक विशिष्ट पद्धत
२४. कप, नंतर
२५. दासी
२७. सरबरीत भात
२९. दरवाजा
३०. तिन्ही लोकांत भ्रमण करणारे एकमेव मुनी, ऋषी
३२. रस्त्यावरील वर्दळ
३३. स्वयंपाक घर (हिंदीत)

**उभे शब्द -**


१. हाडे
२. स्वच्छ पाण्यासाठी नदीच्या पात्रात खोदलेला खड्डा
३. चालू किंवा सुरू च्या विरुद्धार्थी
४. वाढ, विकास, चांगली प्रगती (हिंदीत)
५. माती
६. नांगराचा लोखंडी फाळ
८. विड्याच्या पानांची वेल
१०. एक उबदार पांघरुण
११. माळा
१२. अमर नाही ते
१७. ढेकूण (हिंदीत)
१८. गुटगुटीत
१९. पाणी साठवण्याचे जुन्या काळातील साधन
२०. विहिरीतून पाणी काढायचे यंत्र
२२. पांघरुणाचा एक प्रकार
२३. कालच्या उलट
२६. ताटातूट
२७. सन्मान, मान
२८. मुंबईतील एक प्रसिद्ध भाग
३०. ललना
३१. कुंभाराची भट्टी

**चिन्मयी खेरडीकर** (इ. ११वी)
सरिता वैभव, सिंहगड रस्ता, पुणे 411030


शोधा... www.farmnest.com

**कविता पानोपानी**

# मोबाईल




मोबाईलची किमया आहे का ठाऊक?
दुनिया झाली मोबाईलची भाऊक
पसारा त्यांचा वाढला बघा किती?
घरोघरी प्रत्येकी मोबाईल आला हाती
प्रवासात असतो तो महत्त्वाचा साथीदार
हातात जर नसेल तर म्हणणार कोण रुबाबदार?
कोणाशी कधीही कुठेही बोलू
नको असलेला कॉल आता कसा टाळू?
मोबाईलमधून आम्ही गावोगावी पोहोचतो
कारण कमी पैशात आता खूप टॉकटाईम मिळतो
मोबाईलच्या कंपन्या आल्या किती भरभर
'आमचा मोबाईल किती बेस्ट' सांगत सुटल्या जगभर
तासन्‌तास गप्पा मारण्यात कॉलेज पिढी दंग
कशी आहेस, कधी भेटशील हे विचारण्यात गुंग
परिणाम, दुष्परिणाम या नाण्याच्या दोन बाजू
उचित वापर व्हावा म्हणून बाळकडू पाजू
किती सांगू काय सांगू मोबाईलची व्यथा
दिवस नाही पुरणार आता ऐकण्यास याची कथा.

**कु. नयन जगताप** (इ. ८ वी), आपटे प्रशाला, पुणे

---

# विज्ञानयुग

नव्या युगाचे पाईक आम्ही, आधार असे विज्ञान।
नव्या दमाने लोटून देऊ, हे अंधारी अज्ञान।। १।।

कंदमुळे खाऊन आमचे पूर्वज होते जगले।
यांत्रिक शेतीवाडी राखून वंशज सुखी झाले।। २।।

सालींच्या कपड्यांपासून सुरुवात असे मानवाची।
आता झगमगीत रेशमी वस्त्रे, झळाळी देई सोन्याची।। ३।।

अंधाराला भेदण्याला मशाल जरि धरली हाती।
विजेच्या दिव्याने उरल्या, फक्त देवघरी तुपाच्या वाती।। ४।।

स्वार्थभयापोटी पाषाणाला शस्त्राचे हे रूप दिले।
सूक्ष्मशा अणूतून संहाराचे दर्शन दिले।। ५।।

ओंडक्यापासून झाले चाक, त्यातून झाले वहन।
जल, धरा, आकाशातून, अंतरांचेहि केले दहन।। ६।।

गूढ समस्यांची कोडी अनेक वर्षे खोळंबिली।
संगणकाच्या मदतीसरशी क्षणांत ती सोडविली।। ७।।

शरीराची गुंतागुंत ही आयुर्वेदाने जाणली।
तुटलेल्या भागांवर शस्त्रक्रियेने मात केली।। ८।।

अनंत काळापासून होता झटत, ध्येयवेडा मानव।
सुकर जीवन बनवूनी आजचे, नष्टिले दु:खाचे दानव।। ९।।

आण आज घेतो आम्ही, पेलू नव्या युगाचा भार।
तर्कशुद्ध विचार विज्ञानाचा, बनवू आमचे जीवनसार।।१०।।

**चि. देवव्रत शिरोळकर,** (इ. ११वी)
४५ सौदागर सोसा., कल्याणधन, धनकवडी, पुणे ४३


प्रायो. - श्री. निखिल रामचंद्र कात्रे, डोंबिवली

# वेंकटरामन् रामकृष्णन्
# एक विज्ञानमय जीवन

– कु. कल्याणी मराठे

वैज्ञानिक केवळ अमेरिका, इंग्लंड यासारख्या प्रगत देशातच जन्माला येतात असा आपल्या भारतात खूप जणांचा गैरसमज आहे. हाच गैरसमज दूर करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे श्री. वेंकटरामन् रामकृष्णन्.

त्यांचा जन्म 'नृत्याचा परमेश्वर' – नटराज याच्या मंदिरासाठी प्रसिद्ध असलेल्या तामिळनाडुमधील चिदंबरम् या गावी १९५२ मध्ये झाला. त्यांच्या जन्माच्या वेळेस त्यांचे वडील मॅडिसन मध्ये Postdoctoral fellowship साठी गेले होते. आई देखील मानसशास्त्राची अभ्यासक होती. वेंकटरामन यांच्या लहानपणीच तिने मॅकगिल विद्यापीठात पीएच.डी. केवळ १८ महिन्यांत पूर्ण केली.

मुळातच हुशार असल्याने पहिली ते सहावीपर्यंत वर्गात ते कायम प्रथमच असायचे. मात्र सातवी ते नववी या काळात अभ्यासाव्यतिरिक्त उपक्रमांना त्यांनी प्राधान्य दिलं. विविध कादंबऱ्यांचे वाचन करणे, खेळणे, पोहायला जाणे यांसारख्या अनेक गोष्टी त्यांनी केल्या. त्यामुळे ते वर्गात शेवटून तिसरे आले!!

त्यांच्या शालेय जीवनाच्या शेवटच्या वर्षात त्यांना समर्पित आणि उत्कृष्ट शिक्षक लाभले. या टी.सी. पटेल सरांनी वर्गात विचित्र कल्पना-प्रश्न विचारून विद्यार्थ्यांमधील सुप्त क्षमतांना जागृत केले.

महाविद्यालयीन शिक्षण त्यांनी बडोद्याच्या भौतिकशास्त्र विभागात पूर्ण केले. मेडिकल घेऊन डॉक्टर होण्यात किंवा इंजिनियर बनून भरभक्कम पगार मिळवण्यात त्यांना कधीच रस वाटला नाही. स्वत: काहीतरी संशोधन करण्याची जबरदस्त इच्छा असल्याने 'Basic Sciences' ही साईड घेऊन त्यांनी पदवीपूर्व अभ्यासक्रम केला. या काळात त्यांनी Feynman Lectures in physics, Berkeley physics course यांसारखी पुस्तके वाचली.

बारावीनंतर शिक्षण ओहिओ विद्यापीठात घेतल्यानंतर पदवी शिक्षण अमेरिकेतच पूर्ण करायचे ठरले. पदवी घेतल्यानंतर 'स्थायू अवस्थेवर' तौमायास् तानाकाबरोबर काम करण्यास त्यांनी सुरुवात केली खरी; पण या अंतर्गत प्रयोग करत असतानाच पदवीसाठी 'भौतिकशास्त्र' घेऊन फार मोठी घोडचूक केल्याची जाणीव त्यांना झाली. क्लिष्ट आकडेमोडी करण्यात आयुष्य घालवण्यापेक्षा काहीतरी नवीन करण्याची त्यांना खुमखुमी होती. तेव्हा प्रकाशित होणारे Scientific America हे वार्तापत्र त्यांच्या वाचनात आले, त्यातली जीवशास्त्राची सदरे त्यांना एवढी भावली की, भौतिक शास्त्रातील संशोधनानंतर जीवनशास्त्रातच संशोधन करायचे असे त्यांनी ठरवूनच टाकले. बुद्धिबळ, पाश्चिमात्य संगीत, भटकंती यांसारख्या गोष्टी करत करत १९७६ साली ते भौतिकशास्त्रात वाचस्पती झाले. इथेच ते थांबले नाहीत कारण अजून नवीन शिकण्याची अफाट इच्छा होतीच. लगेचच कॅलिफोर्निया विद्यापीठ (सॅन डिएगो) येथे जीवशास्त्राचे शिक्षण घेण्यास सुरुवात केली. त्यांच्या बुद्धिमत्तेने प्रभावित झालेले रामकृष्णन्, मूर यांच्याशी संपर्क साधून त्यांच्याच प्रयोगशाळेत Ribosomes या पेशीतील एका तत्त्वाच्या रचनेचा व कार्यप्रणालीचा अभ्यास करू लागले.



Ben व Frances Burr या जनुकशास्त्रज्ञांनी त्यांना विविध तंत्रे शिकवली, ज्यामुळे वेंकटरामन् यांना ab - intiogenes च्या विविध Crystallography चे शिक्षण Broakhaven येथे Bob sweet यांजकडून घेण्याची संधी



शोधा... www.vakilno1.com

मिळाली. एखाद्या रचनेचे नकाशात रूपांतरण कसे करायचे हे देखील ते शिकले.

पुढील संशोधनासाठी ते Utah University मध्ये गेले. Ribosome मध्ये genetic message च्या decoding च्या translation मधली अचूकता कशी साधली जाते, याचा शोध त्यांनी लावला.

एप्रिल १९९९ मध्ये ते केंब्रिज विद्यापीठाच्या Molecular biology lab मध्ये गेले. तिथे $S_2O$ structure चा शोध लागला. पीणर मूर, टॉम स्टीझ, ॲडा योनाथ यांच्याबरोबर 50s structure चेही काम करण्यात आले. या नवीन शोधांचे २ paper 'Nature' या जागतिक पातळीच्या शोधनिबंध मासिकात छापून आले. ते जेव्हा त्यानंतर भारतात परतले तेव्हा २८ वर्षे उलटून गेली होती. तेव्हा त्यांना व्याख्याने, भाषणे, Seminars यासाठी आमंत्रणे आली. त्यांना मिळालेल्या Nobel Prize चा विषय तर हमखास काढला जाई.

...तो दिवस होता ७ ऑक्टोबर २००९. बाहेर पाऊस पडत होता. वेंकटरामन् त्यांच्या प्रयोगशाळेच्या वाटेवर होते. त्यातच त्यांच्या सायकलचे टायर पंक्चर झाल्याने ते त्रासले होते. या गडबडीत ते Chemistry च्या nobel prize चा निकाल त्याच दिवशी असल्याचे विसरून गेले होते. तेवढ्यात त्यांच्या फोनची रिंग वाजली. 'Swedish academy of science' मधून फोन होता. त्यांच्या मित्रांपैकी एक – Chris nill याने आपल्या नेहमीच्या खोडकर स्वभावाप्रमाणे फोन केल्याची शंका त्यांना आली. परंतु खरंचच जेव्हा त्यांची खात्री पटली तेव्हा ते नि:शब्द झाले... त्यांना nobel prize मिळालं होतं !

भारतात आल्यावर 'पद्मविभूषण' या पुरस्काराने त्यांना गौरवण्यात आले. त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत होता.

त्यांच्या आत्मचरित्रात ते म्हणतात, ''जानेवारीमध्ये मी जेव्हा 'Cambridge' मध्ये परतलो, तेव्हा शिशिर ऋतुने माझे स्वागत केले. त्या प्रसन्न वातावरणात मी शांतपणे विचार करू लागलो. मला हे कळून चुकले, की nobel prize हे माझ्या भूतकाळातील कष्टांचे चीज आहे, परंतु ते मला माझ्या पुढील प्रवासासाठी आव्हान वाटत आहे. मी माझ्या पुढील आयुष्यात असेच बिकट प्रश्न सोडवण्यास, अडी–अडचणींवर मात करून कामात सातत्य ठेवून, विसावा न घेता काम करण्यास पूर्णपणे सज्ज आहे.''

भौतिकशास्त्रात पीएच.डी. मिळवून, जीवशास्त्राची खास आवड असणारे आणि रसायनशास्त्रात nobel prize मिळवणारे असे हे विज्ञानमय, विनम्रशील अद्वितीय व्यक्तिमत्त्व!!

आपण सुद्धा असाच आदर्श ठेवून आपल्या भारताचे नाव उंचावेल असे काम करण्याची प्रतिज्ञा करूया...!

***

**– कु. कल्याणी मराठे** (इ. ११ वी)
इ –५, तारांगण पार्क, कोथरुड, पुणे 411038

## प्रकल्प स्पर्धा... सहभागी होताय ना !

'छात्र प्रबोधन'च्या सौर ज्येष्ठ अंकापासून 'प्रकल्पांची कमाल, शिकण्यातली धमाल' ही लेखमाला प्रकाशित होत आहे. या लेखमालेतील लेख वाचून तुम्हालाही 'मि. उचापते' व्हायला नक्की आवडणार आहे, याची आम्हाला खात्री आहे. आणि म्हणूनच तुमच्यातल्या मि. उचापतेंना योग्य व्यासपीठ/दिशा मिळण्यासाठीच तर ही प्रकल्प स्पर्धा आम्ही आयोजित करत आहोत. तुम्हाला वेगवेगळ्या टप्प्यांवर जी मदत लागेल ती द्यायलाही आम्ही तयार आहोत. मग होणार ना जास्तीत जास्त संख्येने या स्पर्धेत सहभागी? अधिक तपशीलासाठी मागच्या महिन्यातील अंक पाहा अथवा 'छात्र प्रबोधन'चे संकेतस्थळ पाहा.

## लिहिते व्हा !

सौर ज्येष्ठ (जून ११) अंकातील 'तुम्हाला लिहावंसं वाटतं?' या आवाहनानुसार दिवाळी अंकासाठी खालील मुला-मुलींचं साहित्य आत्तापर्यंत मिळालं आहे. तुम्हीही पाठवताय ना !

**कु. श्रुतिका झाडे, कु. अंजली गोलघाटे, कु. शोभना कांबळे, कु. कोमल देशपांडे (भिडे गर्ल्स हायस्कूल, सीता बर्डी, नागपूर) आकाश देशपांडे, सातारा, अवंती पोरे, पुणे**


**पान प्रायोजक - अमर परांजपे, सांगली**

# आदर्श सामाजिक प्रकल्प
# इंद्रायणी मनोविकास संस्था

– कु. आकांक्षा घाटोळ

आपला समाज विविध अंगांनी बनलेला आहे. येथे अनेक प्रकारचे लोक आढळतात. त्यातील काही विशेष नावारूपाला आलेली मंडळी आहे तर काही समाजात उपेक्षित राहिलेली मंडळी आहेत, त्यातीलच समाजाकडून दुर्लक्षित असणारे लोक म्हणजे मानसिकरित्या दुर्बल असणारे. 'मतिमंद' म्हणून संपूर्ण समाजाकडून त्यांची अवहेलना केली जाते. त्यामुळे मुळातच मनोविकास न झालेल्या या व्यक्ती अधिक खचतात. त्यांचे प्रमाण प्रत्येक शंभर लोकांमागे दोन असे आढळून आले आहे. या व्यक्तींना दैनंदिन कामाचे प्रशिक्षण देऊन स्वत:च्या पायावर उभे करणे ही आज काळाची गरज बनली आहे.

अशा परिस्थितीत या लोकांना प्रशिक्षण देणे, हे आपले सामाजिक कार्य समजून अकोल्यात कार्यरत असणाऱ्या '**इंद्रायणी मनोविकास संस्थे**'विषयी आम्हाला माहिती मिळाली. या सेवादायी संस्थेला आम्ही भेट दिली. संस्थेच्या शाळेतील मुख्याध्यापिका सौ. जयश्री देशमुख यांनी त्यांच्या संस्थेच्या कार्याची माहिती आम्हाला सांगितली. तेव्हा या मतिमंद लोकांच्या जीवनाला नवीन दिशा देणाऱ्या संस्थेचा ओघवता परिचय करून देण्याचा हा अल्पसा प्रयत्न...

समाजापासून वंचित असणाऱ्या मतिमंद मुलांना दैनंदिन जीवनासाठी प्रशिक्षित करणे, हे समाजकार्य समजून १३ डिसेंबर १९८७ ला डॉ. सौ. प्रमिलाताई जैन यांनी या संस्थेची स्थापना केली. या स्थापनेमागील त्यांचे उद्दिष्ट म्हणजे 'मतिमंदांना असणाऱ्या समस्या जाणून घेणे व त्यातून मार्ग काढणे तसेच त्याविषयी जनजागृती निर्माण करणे' हे होय. अकरा जणांच्या कार्यकारिणीसह वयाच्या ७५ व्या वर्षी त्यांनी ही संस्था स्थापन केली. आज या संस्थेचे अध्यक्ष मानसिक रोगतज्ञ डॉ. प्रमोद ठाकरे हे असून उपाध्यक्ष श्री. अजय जैन आहे.

वैयक्तिक पातळीवर कुठलाही स्वार्थ न ठेवता कार्य करणाऱ्या या सामाजिक संस्थेला समाजाकडून देणगीच्या स्वरूपात आर्थिक मदत मिळत असते. महानगरपालिकेकडून मिळालेल्या अडीच एकर जमिनीवर येथील शाळा कार्यरत आहे. येथील विद्यार्थ्यांना सुसज्ज इमारत, यंत्रणा, अमेरिकेवरून आलेले संगणक निपुण शिक्षकवर्ग, इटली वरून मागवलेले पंचिंग, क्रिजिंग मशिन्स इ. सुविधा पुरविल्या जातात. आरोग्यविषयक मदतही काही प्रमाणात पुरवली जाते. या संस्थेअंतर्गत अन्य काही प्रकल्प राबवले जातात.

मात्र संस्था चालवताना अनेक अडचणी येतात. सर्वप्रथम येणारी अडचण म्हणजे आई-वडील आपलं मूल मतिमंद आहे, हे मानायला तयारच नसतात. शासनाच्या नियमानुसार १८ वर्षांवरील मुलांना शाळेत प्रवेश देता येत नाही. त्यामुळे पाहणीनुसार फक्त अकोल्यातच दोन हजार मतिमंद मुले आहेत. मात्र प्रशिक्षण दिले जाते ते फक्त साठ जणांना. तेव्हा याविषयी जनजागृती होणे अत्यंत गरजेचे आहे.

मात्र संस्थेने यावरही उपाय शोधला आहे. १८ वर्षांवरील विद्यार्थ्यांसाठी ही संस्था कार्यशाळा राबवते. या कार्यशाळेत विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढावी, हात व डोळे यांच्यात समन्वय साधावा यासाठी 'धारिणी' (फाईल) तयार करण्याचा मोठा प्रकल्प येथे राबवला जातो. दरवर्षी ७० ते ८० हजार धारिण्या येथील विद्यार्थी बनवतात. बाजारात मिळणाऱ्या धारिण्यांएवढ्या या धारिण्या सुबक व चकचकीत नसल्या तरी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून अनेक विद्यापीठे व बँकांकडून या धारिण्यांची मागणी केली जाते.

मुलाला मतिमंद म्हणून शाळेत प्रवेश घेण्यासाठी बरीच मोठी प्रक्रिया आहे. प्रथम त्याला मानसिक रोगतज्ञाकडे नेऊन त्याचा बुद्ध्यांक काढला जातो. त्याचा अहवाल घेऊन आर. एम. ओ. कडे गेल्यावर त्याने 'हॅन्डीकॅप सर्टिफिकेट' दिले तरच त्या विद्यार्थ्याला प्रशिक्षणास पात्र ठरवले जाते. त्यांनतरही त्याला काही कालावधीसाठी निरीक्षणाखाली

ठेवले जाते व नंतर त्याला शाळेत प्रवेश मिळतो.

या विद्यार्थ्यांची प्रमुख समस्या म्हणजे त्यांना त्यांच्या भावना व्यक्त करता येत नाहीत. त्यांच्या मनात अनेक गोष्टी असतात; मात्र नियोजन करण्यास ते असमर्थ ठरतात. मतिमंद मुलांना आईवडिलांकडूनही सहानुभूतीशिवाय काहीच मिळत नाही. या मुलांवर पैसे खर्च करण्याची तयारी तर काही काही पालकांची नसतेच; पण प्रेम, आपुलकी, सहकार्यही त्यांना मिळत नाही. परिणामत: हे विद्यार्थी अधिकच गोंधळलेले व दबावाखाली वावरताना दिसतात.

शाळेत त्यांना त्यांच्या विकासाच्या दृष्टीने फार लहान लहान गोष्टी शिकवल्या जातात. त्यांच्याकडून त्यांचे नाव, पत्ता, दूरभाष क्रमांक पाठ करवून घेणे, शारीरिक स्वच्छता राखणे हे सुद्धा शिकवले जाते. विद्यार्थी स्वत:चे काम स्वत: करू शकेल व त्याच्या जीवनाला योग्य दिशा मिळू शकेल याद्दष्टीने ही संस्था प्रयत्न करते. बरेचसे विद्यार्थी शारीरिकदृष्ट्या जरी चांगले असले तरी काहींना फिटस्‌चा सामना करावा लागतो. विशिष्ट उंची किंवा झोपाळ्यावर बसल्याने त्यांना फिटस् येतात व ती बेशुद्ध पडतात. प्रत्येक फिटनंतर त्यांचा बुद्ध्यांक कमी होतो. कितीही प्रशिक्षण दिले तरीही त्यांचा बुद्ध्यांक वाढत नाही. मात्र सतत तेच काम करून त्यांचे कौशल्य मात्र वाढते. हे माहीत असल्यामुळे तेथील शिक्षकवर्ग त्या मुलांविषयी मनात प्रेम बाळगून अतिशय संयमाने त्यांना घडवतात. शिक्षकांनाही या मुलांना शिकवण्यासाठी विशिष्ट प्रकारचे प्रशिक्षण घेणे बंधनकारक आहे.

अकोल्यातील ही पहिली संस्था आहे, जी याविषयी जनजागृतीचे मोलाचे कार्य करते. दरवर्षी ८ डिसेंबर विकलांग दिनाच्या निमित्ताने मोठी रॅली काढली जाते. एम. एस्. डब्ल्यू. चे विद्यार्थी पथनाट्य सादर करतात. विविध शिबिरे आयोजित केली जातात.

मतिमंदांना शासनाकडूनही अनेक सवलती पुरवल्या जातात. वाहतुकीबाबतही अनेक सवलती पुरवल्या जातात. निरामय संकल्पनेनुसार त्यांना मोफत आरोग्य विषयक सुविधा पुरवल्या जातात. प्राप्तीकरात सूट मिळते. आई-वडिलांची पेन्शन त्यांना जन्मभर पुरवली जाते.

आजच्या काळाची या लोकांसमोरची मुख्य समस्या म्हणजे प्रथम आई-वडील मुलाला मतिमंद स्वीकारण्यास तयार नसतात व त्यांच्यावर पैसा खर्च करण्यासही तयार नसतात. त्यामुळे ते प्रशिक्षणाचा कालावधीही गमावतात व त्यांचे जीवन उद्ध्वस्त करण्यास कारणीभूत ठरतात.

शेवटी एखादा मुलगा मतिमंद असेल, तर त्यात समाजाची, त्यांच्या आई वडिलांची वा त्यांच्या स्वत:ची तर मुळीच चूक नसते. तेव्हा एक माणूस म्हणून माणुसकीची भावना ठेऊन त्यांना मदत करून ताठ मानेने जगण्यासाठी त्यांना प्रवृत्त करणे, हे आपले सर्वांचेच कर्तव्य आहे.

***

– **कु. आकांक्षा घाटोळ** (इ. ९ वी), लहान उमरी, अकोला

## चाहूल स्पर्धांची...

### सृजनाला पंख नवे - सादरीकरणाची स्पर्धा

'सृजनाला पंख नवे' सादरीकरणाची स्पर्धा आयोजित करत आहोत. इयत्ता पाचवी ते दहावीमधील १० ते २० विद्यार्थ्यांसाठी. सादरीकरणासाठी 'छात्र प्रबोधन'च्या दिवाळी व नित्य अंकांमधून साहित्याची निवड करावी. गट जमवून साहित्याची निवड करायला लागा. सादरीकरण जानेवारी २०१२ मध्ये करावयाचे आहे.

### तुम्हीच संपादक व्हा - हस्तलिखित स्पर्धा

५ ते १० जणांच्या गटाने ५० पृष्ठसंख्येचे हस्तलिखित तयार करावे. साहित्य फक्त मराठीतूनच असावे. हस्तलिखिताला विषयाचे बंधन नाही. जानेवारी २०१२ मध्ये हस्तलिखिते जमा करावयाची आहेत. गट जमवून विषयांची निश्चिती करून प्राथमिक कामांना लागा.

**स्पर्धा २ गटांमध्ये होईल :** १. किशोर गट (इ.५ वी ते ८वी)
२. कुमार गट (इ.९ वी ते १२ वी)

**सविस्तर वृत्त 'छात्र प्रबोधन'च्या सौर कार्तिक/दिवाळी २०११ अंकात वाचा !**



**प्रायोजक - श्री. चिंतामणी बने, डोंबिवली**

# मुक्तहस्त चित्र





*वरील चित्रात दिलेल्या अर्ध्या भागाच्या अनुषंगाने उरलेले अर्धे चित्र पूर्ण करून तर बघा ! आणि रंगवासुद्धा!!*

– **कु. पूर्वा गुर्जर** (इ. ११वी), १५२२ सदाशिव पेठ, पुणे ३०



शोधा... www.onlymyhealth.com

**कथा**



**कु. सानिका समेळ, कु. पूर्वा गुर्जर**



लोकेश खंडेलवाल, एक मोठा उद्योगपती ! वडिलोपार्जित अनेक उद्योग तो चालवायचा. याच स्पर्धायुगात एक नावाजलेलं व्यक्तिमत्व, ज्याने आपला उद्योग शून्यापासून सुरू करून आकाशात नेऊन पोचवला, तो राकेश कुरेशी ! उद्योगांमधील अव्वल स्थान पटकवण्यासाठी या दोघांमध्ये चुरशीची लढत होती.

असेच एका सकाळी, राकेश आपल्या केबिनमध्ये काम करत बसला होता. फोन खणखणला. तो फोन लोकेशच्या ऑफिसमधून होता. ''...हो, हो, नक्की ! म्हणजे काय सर... तुमच्यासारख्या यशस्वी उद्योगपतीशी हात मिळवायला मला नक्कीच आवडेल; पण मला विचार करायला वेळ द्या. मी लवकरात लवकर कळवतो.''

राकेशने फोन ठेवला आणि लगेच मिटींगचे प्रयोजन केले. खंडेलवाल इंडस्ट्रीज्कडून आलेला हा प्रस्ताव राकेशने सगळ्यांसमोर मांडला, तो आनंदाने मान्यही झाला. आता फक्त दिवस, वेळ आणि ठिकाण ठरवणे बाकी होते. यासाठी राकेशने लोकेशशी संपर्क साधला. राकेशचे बोलणे ऐकून लोकेश खूश झाला. लगेचच्या दोन दिवसांत औपचारिकरित्या दोन मोठ्या इंडस्ट्रीजमध्ये करार झाला देखील ! याच आनंदाप्रीत्यर्थ दुसऱ्या दिवशी रात्री हॉटेल 'रूबी क्लब' मध्ये जेवायला जाण्याचा दोघांनी बेत ठरवला; पण त्याआधी ७.३० वाजता एका ठिकाणी एकत्र भेटून पुढे जायचे ठरले.


ठरल्याप्रमाणे राकेश शहरापासून दूर असलेल्या केमिकल फॅक्टरीपाशी पोहोचला. आधीपासूनच तेथे लोकेशची गाडी लांबवर उभी होती. राकेशने आपल्या ड्राइव्हरला लोकेशच्या गाडीपाशी जाऊन बघण्यास सांगितले. तेवढ्यात ओरडण्याचा आवाज आला, ''वाचवा ! वाचवा !''

ड्राइव्हरच्या परतीची वाट न बघता, राकेश त्या आवाजाच्या दिशेने पळत फॅक्टरीमध्ये पोहोचला. मागून राकेशचा ड्राइव्हरदेखील तेथे पोहोचला पण... त्याने पाहिलेल्या थरारक दृश्यामुळे तो भीतीने शहारून गेला. जमीनीवर राकेश रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. जेव्हा ड्राइव्हरची नजर बाहेर गेली, तेव्हा त्याने एका राखाडी कोट घातलेल्या माणसाला लोकेशच्या गाडीच्या दिशेने पळताना बघितले व तो माणूस गाडीतून पसार झाला. ड्राइव्हरने क्षणाचाही विलंब न करता सी. आय. डी.शी संपर्क साधला.

लगेचच त्या ठिकाणी तपासणी सुरू झाली. खून झालेली व्यक्ती राकेश कुरेशी आहे, हे त्याच्या खिशातील I card व त्याच्या ड्राइव्हरच्या कबूली जबाबावरून निश्चित झाले.

दुसऱ्या दिवशी सकाळी, संशयितांना ब्यूरोमध्ये बोलवण्यात आले. त्यातील पहिले नाव राकेशच्या


प्रायोजक - श्री. विद्याधर सहसबुद्धे, अंधेरी




ड्राइव्हरचे होते. त्याच्याशी सविस्तर बोलणे झाल्यावर सगळे ऑफिसर्स ब्यूरोमध्ये चर्चा करत होते.

''सर, त्यावेळची परिस्थिती बघता, मला नाही वाटत की राकेशचा ड्राइव्हर खोटं बोलत आहे'', सीनियर इन्स्पेक्टर वीर म्हणाला.

लगेचच त्याला दुजोरा देत एस. आय. रिषभ उत्तरला, ''हो सर. राखाडी कोटातल्या माणसाला लोकेशच्या गाडीच्या दिशेने पळताना पाहिल्याचे तो सारखे सांगत होता.''

''आणि सर, तो माणूस गाडीच्या मागच्या सीटवर बसला. यावरून तर लोकेशवरील संशय वाढला आहे'', नताशा म्हणाली.

आता लोकेशचा ड्राइव्हर घाबरत घाबरत म्हणाला, ''मी शांतपणे गाडीत बसलो होतो. अचानक 'वाचवा! वाचवा!' असा आवाज मला ऐकू आला. राकेश सर आणि त्यांचा ड्राइव्हर केमिकल फॅक्टरीच्या दिशेने पळत होते. मला काही कळण्याआधी व मी गाडीतून उतरण्याआधीच लोकेश सर पळत पळत आले व त्यांनी मला घराच्या दिशेने गाडी नेण्यास सांगितले. त्यांच्या चेहऱ्यावरील काळजी बघून मी काहीही न बोलता गाडी घराच्या दिशेने वळवली.''

तेवढ्यात A.C.P. राणांनी रागाने हात टेबलावर आपटला व आपल्या भारदस्त आवाजात म्हणाले, ''यावर आम्ही विश्वास का ठेवावा?''

''सर, मी खोटं का बोलीन? सर, मी गरीब माणूस! दोन वेळचं जेवण पगारातून कसं बसं भागतं. जे झालं ते खरं खरं सांगतोय'' लोकेशचा ड्राइव्हर म्हणाला, ''सर, हवंतर तुम्ही रामूला विचारा''

''रामू कोण?'' सोनालीने विचारले.

''रामू, लोकेश साहेबांच्या घरचा वॉचमन. जेव्हा मी साहेबांना सोडायला गेलो. तेव्हा त्यानेच दरवाजा उघडला होता.''

A.C.P. राणांच्या डोक्यातली चक्रं सुरू झाल्यामुळे, त्यांनी

लोकेशच्या ड्राइव्हरला जाण्यास सांगितले.

परत एकदा, खूनाच्या ठिकाणी जाऊन तपासणी करायचे ठरले. सगळ्यांनी कसून शोध घेतल्यावर रक्तानी माखलेला एक सुरा आणि लोकेश खंडेलवाल यांचे Credit card त्याठिकाणी सापडले. आता मात्र ही (केस) एकतर्फी होत चालली होती. दोन्ही ड्राइव्हरच्या साक्षीने आणि मिळालेल्या पुराव्यानुसार खूनाचा आरोप लोकेशकडे झुकत होता. ताबडतोब लोकेशला ब्यूरोमध्ये बोलावले गेले. व तो सुरा फॉरेन्सिक तज्ज्ञ डॉ. कुमारांकडे पाठवला गेला.

''काय लोकेश, मार्केटमधली स्पर्धा जिंकण्यासाठी प्रतिस्पर्धीचा खून केलास,'' A.C.P. राणा गरजले. यावर लोकेश दचकून बोलला.'' स... सर, सर, मी केला खून? नाही सर, तुम्ही ते काय बोलताय सर, तो तर माझा चांगला मित्र होता आणि मार्केटच्याच भाषेत बोलायचे झाले तर आमची डीलही पक्की झाली होती.'' त्याचे वाक्य तोडून वीर म्हणाला, ''हो आणि हीच संधी साधून राकेशला फोन करून रेड्डी केमिकल फॅक्टरीपाशी बोलवलेस आणि त्याचा खून केलास.

नाही, सर, मी त्याचा खून नाही केला. आणि... फोन तर मी केलाच नव्हता. राकेशचाच फोन आला होता की, त्याला हे डील करायचे आहे आणि सर, एका गोष्टीचे मला आश्चर्य वाटते आहे की, मला त्यादिवशी साधारण संध्याकाळी सहा वाजल्यापासून ते दुसऱ्यादिवशी उठेपर्यंत काहीच आठवत नाही... सर, आणखी एक सांगायचं म्हणजे गेल्या आठवड्यात माझ्या महत्त्वाच्या डॉक्युमेंटस् चोरी झाल्यापासून सगळंच विचित्र वाटतंय.''

''म्हणजे नक्की काय काय चोरीला गेले?'' यावर लोकेशने त्याचे I-card आणि Credit card कार्ड चोरीला गेल्याचे सांगितले. थोडे बाजूला गेल्यावर नताशा म्हणाली,

''सर, जर लोकेशने फोन केला नव्हता, तर मग राकेशच्या ऑफिसमधील सगळेजण असे का म्हणले की डीलचा प्रस्ताव लोकेशच्या कंपनीकडून आला होता?''

रिषभ म्हणाला, ''सर, याशिवाय, जर लोकेश खरं बोलत असेल, तर त्याला त्या संध्याकाळी घडलेल्या घटनांपैकी काहीच कसे आठवत नाही? आणि लोकेशने सांगितल्याप्रमाणे त्याचे Credit card गेल्या आठवड्यात चोरी झाले, पण १८आपल्याला ते खूनाच्या ठिकाणी सापडले. सर, जर का हा खरं बोलत असेल तर नक्कीच काहीतरी गडबड आहे.''

आता ही केस उलट फिरायला लागली होती. म्हणून, A.C.P. राणांनी पुन्हा एकदा खूनाच्या ठिकाणी लोकेशला घेऊन जाण्याचा निर्णय घेतला.

काही वेळातच सर्वजण फॅक्टरीच्या आवारात पोहोचले आतमध्ये पाऊल टाकताच, लोकेश चक्कर येऊन, बेशुद्ध पडला. काही क्षण शांततेत गेले. कोणालाच काहीच कळले नाही. पण लगेचच लोकेशला रुग्णालयात नेण्यात आले.

डॉक्टर बाहेर येताच A.C.P. राणांनी लोकेशच्या तब्येतीबद्दल विचारपूस केली. तेव्हा जे डॉक्टरांनी सांगितले, ते ऐकून सगळेच कोड्यात पडले. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार लोकेशला एका विशिष्ट गटातील रसायनांची ॲलर्जी होती, जी रसायन त्या फॅक्टरीमध्ये मोठ्या प्रमाणात होती. डॉक्टरांनी हे देखील नमूद केले की अशा ठिकाणी लोकेश ३-४ सेकंदही थांबू शकत नाही. लगेचच A.C.P. राणा आपल्या सहकाऱ्यांकडे बघून बोलले, ''जर, लोकेश ३-४ सेकंदही तिथे राहू शकत नसेल, तर तो खून कसा करू शकेल?''

झालं ! लोकेशच्या उलट तपासणीला सुरुवात झाली. A.C.P. राणा म्हणाले, ''तू म्हणतोस की तुझी वैयक्तिक कागदपत्रं म्हणजे I-card आणि Credit card चोरीला गेले. पण नक्की ही कागदपत्रे कोण हाताळू शकतं? म्हणजे तुझा कोणावर संशय आहे?''

लोकेश उत्तरला, ''सर, संशय असा नाही; पण त्या कागदपत्राला मी, माझी P.A. आणि माझा Peon"...

वेळ न घालवता वीर म्हणाला,



प्रा.- श्री. सागर सुभाष सुराणा, चिंचवड, पुणे

''सर या दोघांनाही ताबडतोब ब्यूरोमध्ये बोलावले पाहिजे...''

''पण सर, हे दोघं विश्वासातले आहेत. ते असं काही नाही करणार'', लोकेश म्हणाला.

A.C.P. राणा उत्तरले, ''नाही लोकेश ! कोणीही असू शकतं, कायद्यामध्ये सर्वांवर संशय घेणे क्रमप्राप्त ठरतं.''

२ तासांत रिषभ लोकेशच्या P.A. बरोबर ब्यूरोमध्ये हजर झाला. A.C.P. राणा त्याच्याकडे बघत म्हणाले, ''रिषभ, लोकेशचा Peon - दिग्विजय कुठे आहे?''

रिषभ उत्तरला, ''सर तो पळून गेला आहे. तो ऑफिसमध्ये आणि त्याच्या घरीही नाही सापडला. आजूबाजूच्या लोकांनी सांगितलं की तो २ दिवस घरी आलाच नाही.''

''काय?? अं... लोकेश, तुझ्या Peon चा फोटो वगैरे बघायला मिळेल का? म्हणजे तातडीने शोधाशोध सुरू करता येईल,'' A.C.P. राणांनी विचारले.

आठवून लोकेश म्हणाला, ''सर, माझ्याकडे नाहीये; पण आमच्या ऑफिसच्या वेबसाईटवर मिळू शकेल. दिग्विजयच्या Personal Information मध्ये !'' वेबसाइटवरचा दिग्विजयचा फोटो बघून सर्वजण विस्मयचकित झाले. नताशा म्हणाली, ''सर, हा तर...'' A.C.P. राणा वाक्य तोडत उद्‌गारले, ''हो नताशा, बरोबर! हा तर लोकेशचा ड्राइव्हर जो फक्त त्या संध्याकाळी या कामावर होता. लगेच त्याचा फोन ट्रेस करायचा प्रयत्न करा.''

लगेचच शोध चालू झाला. दिग्विजय सांताक्रूझ विमानतळावर असल्याचे कळले.

''रिषभ, नताशा लगेच पकडा त्याला! क्षणाचाही विलंब न करता...'' A.C.P. राणा उद्‌गारले.

(३ तासांनी ब्यूरोमध्ये....)

''बोल, दिग्विजय, का केलास खून बिचाऱ्या राकेशचा? बोल!'' A.C.P. राणा कडाडले.

''बिचारा...? आणि राकेश?... सर, तुम्हाला काहीच माहित नाहीये.''

''म्हणजे?''

''सर, त्या दुष्ट माणसामुळे मी ५ वर्ष गजाआड होतो. आधी आम्ही खूप चांगले मित्र होतो, बिझनेस पार्टनरशिप करायची ठरवली होती. पण... पण... त्याने धोका दिला. सर्व नफा त्याला मिळाला आणि मला... मला कायद्याने गुन्हेगार ठरवले.''

''पण तू हे सर्व केलंस तरी कसं?'' रिषभने विचारले. दिग्विजय उत्तरला.

''शत्रूचा शत्रू तो आपला मित्र! त्यामुळे सर्वप्रथम मी लोकेशच्या ऑफिसमध्ये कामाला लागलो. हळूहळू मी त्याचा विश्वास संपादन केला. यामुळेच त्याने मला त्याच्या वैयक्तिक गोष्टींची काळजी घेण्यास नेमले आणि मला हेच हवे होते. मी एकदा काम करत असताना लोकेशचे I-card आणि Credit card चोरले. नंतर राकेशला डीलसाठी फोन केला. यानंतर राकेश आणि लोकेशमधील हे डील सुरळीत पार पडले. राकेशला वाटत होते की लोकेशकडून हा प्रस्ताव आला आहे आणि लोकेशला बरोबर उलटे! त्यांच्या भेटीची संधी साधून मी राकेशचा, त्या फॅक्टरीत खून केला. लोकेशवर संशय यावा यासाठी त्याचे Credit card तिकडे टाकले.''

''पण लोकेश त्यावेळी कुठे होता? काय करत होता?'' कोड्यात पडलेली नताशा म्हणाली.

''मी लोकेशला एक प्रकारचे ड्रग दिले, ज्यामुळे त्याची शुद्ध हरपली आणि त्याला त्या काळात घडलेले काहीच आठवले नाही. लोकेशवरील संशय बळावण्यासाठी मी त्याचाच ब्लेझर घालून खून केला. नंतर पळत जाऊन लोकेशच्या गाडीच्या मागच्या सीटवर बसलो. त्यामुळे राकेशच्या ड्राइव्हरला वाटले की, पळणारा माणूस लोकेश आहे. त्यानंतर लोकेशला घरी पोचवले व तेव्हाच माझे वॉचमनशी बोलणे झाले.''

यावर तडक A.C.P. राणा म्हणाले, ''वा! काय प्लॅनिंग आहे. हेच डोकं चांगल्या गोष्टीत लावलं असतंस तर कुठल्या-कुठे पोहोचला असतास! पण, आता मात्र शिक्षेला पर्याय नाही.''

***

**कु. सानिका समेळ,**
**कु. पूर्वा गुर्जर** (इ. ११ वी)
५१० सदाशिव पेठ,
पुणे 411030



शोधा... www.indiadiets.com

कविता
पानोपानी

# आयुष्य हे असंच जगायचं असतं...

जे घडतं ते सहन करायचं असतं
संकटाला कंटाळून कधी पळायचं नसतं,
त्याला सामोरं जायचंच असतं,
बदलत्या जगासोबत जगायचं असतं,
आयुष्य हे असंच जगायचं असतं ।।

कुणी अडवलं म्हणून बिचकायचं नसतं
आपलं चांगलं काम रेटायचंच असतं
अपयशाने खेद करत बसायचं नसतं
जिद्‌दीच्या जोरावर यशशिखर गाठायचं असतं
आयुष्य हे असंच जगायचं असतं ।।

दु:ख अश्रूंना हृदयी कोंडवायचं असतं
हसता येत नसलं तरीही हसायचंच असतं
नाराजीच्या तावडीत कधी सापडायचं नसतं
क्षणोक्षणी चैतन्याने बहरून जायचं असतं
आयुष्य हे असंच जगायचं असतं ।।


कुणासाठी काहीतरी नि:स्वार्थीपणे करायचं असतं
इतरांच्या सुखात स्वत:चं सुख शोधायचं असतं
पंखांमध्ये बळ आल्यावर गगनात झेपावून
घरटं सोडायचं असतं...
आकाशात झेपावूनही धरतीला विसरायचं नसतं
आयुष्य हे असंच जगायचं असतं ।।

पोटासाठी तडफड मरायचं असतं
मरतामरता नवं जीवन जगायचं असतं
कुठून सुरू झालं हे माहीत नसलं तरी
कुठे थांबायचे हे नक्कीच ठरवायचं असतं
आयुष्य हे असंच जगायचं असतं ।।



**कु. गौतमी सडेकर** (इ. १२वी)
सी-५०१, सिल्व्हर क्रेस्ट, शिवतीर्थनगर, कोथरुड, पुणे ३८


**प्रायोजक - स्टॅटफिल्ड इक्विपमेंट, पिरंगुट, पुणे**




# माझी अविस्मरणीय सहल

कु. मैत्रेयी मुळावकर

१५ मे २००९. आमच्या घरी नातेवाईक जमले होते. घरी थोडीफार गडबडच होती. कारण मी ११ दिवसांच्या अमेरिका टूरवर जाणार होते.  व्हिसा, पासपोर्ट सगळं तयार केलेलं होतं. मी मुळावकर घराण्यातली पहिली विदेशात जाणारी ठरणार होते. केसरीच्या नासा टूरमध्ये  मी सहभागी झाले होते. थोडी धाकधूक वाटत होती आणि यात भर म्हणजे केसरीने टूरच्या दोन आठवड्यांपूर्वी घेतलेल्या इंट्रोडक्शनच्या कॅम्पला मी एन्‌टीएस परीक्षेमुळे उपस्थित नव्हते.

मी बाबांसोबत ट्रेनमध्ये चढले सगळ्यांचा निरोप घेतला. सकाळी ७ वाजता आम्ही मुंबईला पोहोचलो. रात्री १२ ची फ्लाइट होती. तो दिवस मुंबईतच एका नातेवाईकांकडे घालवला.

९ पर्यंत सगळी मंडळी जमली. मी कोणालाच ओळखत नव्हते. इंटरनॅशनल फ्लाइटचा ना मला अनुभव होता, ना माझ्या बाबांना ! तिथले सगळे 'सोपस्कार' मला नवीन होते. मग सगळे करतील तसे करायचे ठरले! बाबांचा निरोप घेतला. मी आत गेले. सिक्युरिटी चेकिंग झालं.

थोडी भीती, थोडी एक्साइटमेंट होती. विमानात आपापल्या सीटवर


शोधा... www.antya.com

बसलो. विमानाने उड्डाण केले. थोडं जेवण झालं. विमानात १६ तास घालवायचे होते. मधून मधून कोल्ड्रिंक पिणे, पिक्चर्स बघणे, गेम खेळणे सुरू होते. १७ तारखेला आम्ही स्थानिक वेळेनुसार सकाळी ९च्या सुमारास अमेरिकेतील अटलांटा येथे पोचलो. पुढचे विमान तिथूनच होते. एक तास हातात होता. विमान तळावर एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याकरता छोटी एअर कंडिशन्ड ट्रेन होती. ट्रेनने दुसरीकडे जाताना दूरवर पसरलेली मैदाने, मोठी मोठी तळी असे नयनरम्य दृश्य दिसले आणि तेसुद्धा विमानतळाच्या आत !

दुसऱ्या विमानात बसून आम्ही अटलांटाहून ऑरलँडोला गेलो. तिथून भव्य बसने कोकाबीचला पोहोचलो. रात्री जेवण करून ८ वाजता झोपलो. दुसऱ्या दिवसापासून आमचा दिनक्रम सुरू झाला.

सकाळी साडेपाच वाजता वेकअप कॉल यायचा. उठून तयार होऊन आम्ही ब्रेकफास्ट घ्यायचो. ५ दिवस आम्ही कोकाबीचमध्ये होतो. आम्ही तिथून केनडी स्पेस सेंटर (के.एस.सी) येथे जायचो. आम्हा ५६ जणांकरता तीन व्हॉलेंटियर्स होते. आम्ही तेथे वेगवेगळे उपक्रम केले, व्याख्याने ऐकली. रॉकेट गार्डनला भेट दिली.

पहिल्या दिवशी आम्ही रॉकेटस् बनवली. नंतर आमचे गट बनवले गेले. सगळी गटकार्ये आम्हाला या गटांतच करायची होती. पहिल्या दिवशी आम्हाला चंद्रावरील पुलाकरीता मजबूत मॉडेल बनवायला सांगितले. दुसऱ्या दिवशी आम्हाला उंच टॉवर बनवायचा होता. तेव्हा सर्व साहित्याचा वापर करून आम्ही मजबूत बेसचा टॉवर बनवला आणि आमचा प्रथम क्रमांकही आला. नंतर आम्हाला पॅरॅशूटसारखे लाँचर, वायू शक्तीवर चालणारी गाडी बनवणे यांसारखे उपक्रम दिले गेले. पाचव्या म्हणजे नासातील शेवटच्या दिवशी आम्ही 'हॉल ऑफ फेम' मध्ये गेलो. तेथे आम्ही १/६ गुरुत्वाकर्षण बल, अवकाशात चढताना-उतरताना कसे वाटते, चंद्रावर चालणे, फिरणे याचा अनुभव घेतला. अंतराळवीरांना दिलेले प्रशिक्षणसुद्धा आम्ही अनुभवले. रोबोटिक्सचा परिचय पण करून घेतला. आमचे शेवटचे गटकार्य होते, अवकाश सफरीचे नाटक! चारही गटांपैकी केवळ आमच्याच गटाच्या अवकाश यानाने बरोबर उड्डाण केले व अतिशय योग्य पद्धतीने लाँचही झालं.

पाचव्या दिवशी शेवटच्या तीन २२तासात आम्ही खरी अवकाशयाने आणि रॉकेट्स पाहिली. अपोलो मिशनचे रॉकेट व त्यांची रचना समजून घेतली. नासाच्या के. एस. सी. मध्ये आम्ही खूप गोष्टी शिकलो. नासातील भारतीय शास्त्रज्ञ डॉ. रवी आम्हाला आमच्या हॉटेलवर येऊन भेटले. त्यांनी आम्हाला अनेक गोष्टी सांगितल्या.

नासामध्ये ५ दिवस घालवल्यानंतर आम्ही ऑरलँडोला गेलो. तेथे सी वर्ल्ड व डिसनी लँडमध्ये गेलो. सी वर्ल्डमध्ये पेंग्विन, पोलार बेअर, शार्क, सी हॉर्स, ऑक्टोपस पाहिले. शोमू (डॉल्फिनचा प्रकार) चा शो, कॅट शो, डॉग शो पाहिले. डिसनी लँड हे प्रचंड मोठ्या भूभागावर पसरलेले जणू गावच आहे. तेथील ई. पी. सी. ओ. टी. (एक्सपरिमेंटल प्रोटोटाईप कम्युनिटी ऑफ टुमॉरो) या सेंटरला भेट दिली. डिसनी परेड ही खूप प्रसिद्ध आणि रमणीय अशी परेड पाहिली. त्यात सगळे डिसनी कॅरॅक्टर्स सहभागी झाले होते.

शेवटचे दोन दिवस आम्ही न्यूयॉर्कमध्ये घालवले. वर्ल्ड ट्रेड सेंटर, एम्पायर स्टेट बिल्डिंग या प्रसिद्ध ठिकाणांसोबत जगातील आश्चर्यांपैकी एक ठरलेल्या स्टॅच्यू ऑफ लिबर्टीला भेट दिली.

अमेरिकेतील लोकांचा स्वभाव मला खूप आवडला. ते अतिशय प्रेमळ, स्वतंत्र, आधुनिक विचारसरणीचे, सकारात्मक दृष्टिकोन असलेले व सहिष्णू होते.

एकूणच माझी ही केसरीची नासा, डिसनी लँड व न्यूयॉर्क टूर खूप छान झाली. या टूरमध्ये मी खूप नव्या गोष्टी शिकले. अनेक नव्या गोष्टींचा अनुभव घेतला. ही टूर मी कधीही विसरू शकणार नाही.

***

**कु. मैत्रेयी मुळावकर** (इ. १०वी)
गड्डम प्लॉट, अकोला



**प्रायोजक - चि. अखिलेश संतोष काकडे, पुणे**

# अज्ञात

चि. ओंकार भाटवडेकर

जेम्स त्याच्या नेहमीच्या सवयीनुसार रात्री उशिरापर्यंत जागा होता. त्याच्या आवडत्या टीमची मॅच चालू होती. मधेच तो कंटाळला आणि त्याने चॅनल्स भराभरा बदलायला सुरुवात केली. अचानक एका बातमीने त्याचे लक्ष वेधले आणि तो पूर्णत: गांगरला.

**विख्यात शास्त्रज्ञ डॉ. पॉल हेण्डरसन गायब**

नामांकित अशा मॅक्सम्युलर संस्थेचे वाचस्पती आणि रॉयल सोसायटी ऑफ फिजिक्सचे ज्येष्ठ सदस्य 'शास्त्रज्ञ रिचर्ड फाईनमन' यांचे सहकारी, 'डॉ. पॉल हेण्डरसन हे भौतिकशास्त्रामधील जगातलं एक नावाजलेलं व्यक्तिमत्त्व! जेम्स हा डॉ. पॉल यांचा लाडका शिष्य आणि पर्सनल असिस्टंट होता. त्याने त्यांची संशोधने जिद्दीने आणि कौशल्याने पार पाडली होती. जेम्स ही बातमी ऐकून इतका उडाला की, गडबडीत घराबाहेर पडताना त्याने टी.व्ही पण बंद केला नाही.

तो तडक डॉ. पॉल यांच्या संशोधनाच्या ठिकाणी निघाला. 'जुनाट इमारत, तुटायला आलेलं दार, खिडक्या नाहीत आणि एक तुटकी पत्रपेटी,' असं ते ठिकाण बघून लोक तिथं फिरकतही नसत. वाटेत चालत असताना तो असंख्य गोष्टींचा विचार करत होता. गेले काही दिवस डॉ. पॉल काहीतरी विचित्र वागत होते.

त्याला एका आठवड्यापूर्वीचा प्रसंग आठवला... जेम्स हा बेसबॉलचा चाहता होता. तो बरेचदा मॅचेस् पाहण्यासाठी कामावरून लवकर जात असे. डॉ. पॉल यांना बेसबॉलचंच काय, पण कामाव्यतिरिक्त कुठल्याच गोष्टीत रस नव्हता; पण त्या दिवशी जेम्स जेव्हा लवकर घरी परतण्यासाठी डॉ. पॉल यांना भेटायला गेला तेव्हा चक्क त्यांनी त्याला मॅचचा स्कोर काय असेल हे सांगितले. एवढेच नाही तर कोण खेळाडू कसा खेळेल याचं वर्णनही केलं; परंतु त्यांचा स्वभाव विक्षिप्त असल्यामुळे जेम्सला या गोष्टीचे नवल वाटलं नव्हतं; पण खरंच तसंच झालं.

२ दिवसांपूर्वीही अशीच घटना घडली होती... जेम्स त्याच्या नेहमीच्या वेळेपेक्षा १ तास लवकर गेला होता. त्याला काही गोष्टींची नोंद करायची होती; पण जेव्हा तो तिथे गेला तेव्हा त्याला कोणीच दिसले नाही. हे डॉ. पॉल ह्यांच्या वेळापत्रकात बसणारे नव्हते. अचानक आतल्या खोलीत खडबड झाली म्हणून तो आत गेला, तर डॉ. पॉल तिथे काहीतरी वाचत बसले होते आणि काही बोलायच्या मनस्थितीत नव्हते. जेम्सला आता त्यांच्या वागण्यातील बदलाचे गांभीर्य कळू लागले होते.

तो लॅबपाशी कधी पोचला त्याचे त्यालाच कळले नाही. तो तिथे पोचताच त्याला पाच पोलीस अधिकारी चर्चा करताना दिसले. अजूनही धक्क्यातून न सावरल्यामुळे तो जाऊन नुसताच उभा राहिला.

तेवढ्यात फिल नावाच्या अधिकाऱ्याने त्याला बोलावून घेतले. ''तुम्हीच जेम्स सदरलँड ना?''

''हो'' घाबरत घाबरतच जेम्सने उत्तर दिले. तो थोडाफार भानावर येतो न येतो, तोच फिलनी त्याच्या हातात एक पाकीट ठेवले.

''डॉ. पॉल हेण्डरसन यांच्या लॉकर मधून हे एक छोटंसं पाकीट मिळालंय. ते गुप्त राहावे अशी त्यांची इच्छा दिसतेय,'' थोड्याशा उत्सुकतेनेच फिल म्हणाला.

जेम्सने ते पाकीट हातात घेतले. त्यावर लिहिले होते;

CONFIDENTIAL !

ONLY TO BE HANDED OVER TO JAMES SUTHERLAND

जेम्सला ते पाकीट दिल्यावर फिल म्हणाला.

''रात्रीचे २ वाजले आहेत. आत्ता हे कुठे गेले असतील काही कल्पना?'' ''नाही,'' जेम्स उत्तरला.

''या वेळेला ते इथेच आतल्या खोलीत झोपलेले असतात.''

''त्यांचे कोणी शत्रू?''

''मी त्यांना १० वर्षांपासून ओळखतोय. त्यांची कोणाशी मैत्रीही नव्हती न् शत्रुत्व सुद्धा नाही. ते त्यांच्या कामाशिवाय अन्य कशातच रस ठेवत नसत.''

''बरं त्यांचे कोणी नातेवाईक?''

''माझ्या माहितीनुसार त्यांचा विवाह झालेला नव्हता. पण त्यांचा एक भाचा आहे; तो इथे नसतो आणि त्याच्याशी त्यांचे फार संबंधही नव्हते.''

''बरं. या पाकीटात काय असेल, काही कल्पना?''

''नाही. ते मला माझा महिन्याचा पगार सोडून दुसरं काही देत नसत.''

''तुमचं त्यांच्याशी नातं कसं होतं?''

''म्हणजे? तुम्हाला काय म्हणायचंय''? जेम्स चपापला. फिल पुढे काय विचारणार याची त्याला कल्पना आली. ''म्हणजे तुम्ही गेल्या २४ तासांत कुठे होतात व काय करत होतात?''

''मला डॉ. पॉल वडिलांसारखे आहेत. मी त्यांना गायब का करेन? त्यांच्याचमुळे मी आज उभा आहे. आज रविवार असल्याने सुट्टी होती. मी माझ्याच खोलीत साफसफाई केली व बाहेर जाऊन आलो.''


''ठीक आहे. तुम्ही जाऊ शकता; पण त्या पाकिटाबद्दल काय ते आम्हाला सांगा. ती माहितीच आम्हाला कामी येईल. आम्ही तपास करतच आहोत.''

जेम्स सुन्न मनाने घरी निघाला खरा; पण त्यालाही आता उत्सुकता लागली होती आणि काळजीसुद्धा! घरी पोहचताच त्याने पाकिट उघडून बघितले. पाकिट उघडताच त्याला अजून एक धक्का बसला. पाकिट रिकामे होते! त्याने उलट-सुलट करून पाहिले तर आत काहीच नव्हते; पण त्याला माहीत होतं, की डॉ. पॉल हे कोणी छोटे शास्त्रज्ञ नव्हते. म्हणूनच त्याने ते पाकिट परत एकदा नीट बघितले. त्याला त्या पाकिटाच्या फ्लॅप वर एक छोटासा कप्पा दिसला. त्यात त्याला एक छोटीशी मायक्रोडॉट सापडली. कॅसेटसारखे हे उपकरण दिसायला जरी गव्हाच्या दाण्याएवढे असले, तरी त्यात माहितीचा साठा अफाट असतो. मॅग्नेटच्या खालून फिरविल्यास त्यातली माहिती कळू शकते.

जेम्सने लगेच जाऊन त्या उपकरणातली माहिती कॉम्प्युटर वर टाकली. त्यामध्ये एक व्हिडिओ होता; पण कॉम्प्युटरने त्याला पासवर्ड मागितला. जेम्सने डॉ. पॉल यांचे नाव, आडनाव, लॅबचे नाव, अनेक शास्त्रज्ञांची नावे, जन्म तारीख असं सगळं टाकून पाहिलं; पण छे! काहीच उपयोग झाला नाही. आता रात्रीचे साडेतीन वाजले होते; पण जेम्सची झोप मात्र पूर्ण उडली होती. त्याला आता फक्त पासवर्डच्या त्या नऊ रिकाम्या जागा दिसत होत्या...

...पहाटेचे पाच वाजले. अजूनही जेम्सला उत्तर मिळत नव्हते. आता मात्र तो हताश झाला. अन् दिवसभर केलेल्या कामामुळे थकलाही होता. साहाजिकच त्याचा डोळा लागला... १० मिनिटं झाली तोच त्याला एकदम जाग आली. अचानक त्याला डॉ. पॉल यांचा नवीन प्रबंध आठवला. गेले काही दिवस ते Boltzman Constant वर काम करत होते. तो आकडा आहे $1.3806503 \times 10^{-23}\ m^2\ kg\ s^{-2}\ k^{-1}$. त्याने जवळ जवळ लॅपटॉपवर झडपच घातली आणि झटकन पासवर्ड टाकला 1.3806503 आणि व्हिडिओ उघडला! जेम्स स्वत:वरच खूश झाला. अचानक त्याला हुरूप आला; पण पुढे काय असेल याची त्याला कल्पनाच नव्हती.

त्याने व्हिडिओ चालू केला. प्रोफेसर डॉ. पॉल एका खुर्चीत बसले होते. त्यांचं बोलणं सुरू झालं.




प्रायोजक - शंतनू पटवर्धन, टेक्सास, अमेरिका

''शाब्बास जेम्स! तू ज्याअर्थी मला आत्ता बघू शकत आहेस त्या अर्थी तुला मी दिलेला मायक्रोडॉट तू चालू करू शकला आहेस. माझ्याकडे खूप कमी वेळ आहे. मी जे सांगत आहे त्याकडे नीट लक्ष दे.

आपल्या जगात भूत, वर्तमान आणि भविष्य असे तीन काळ आहेत. यांना 'Entropy' चे नियम लागू होतात. सोप्या भाषेत सांगायचं झालं तर, 'जगात अस्ताव्यस्तपणा वाढतंच जातो.' जेवढा अस्ताव्यस्तपणा जास्त, तेवढी high entropy! आता हे उदाहरण बघ... जर तू एखाद्या खोलीत नीट मांडलेली पुस्तके ठेवलीस आणि दुसऱ्या खोलीत अस्ताव्यस्त पडलेली, तर २० वर्षांनी पुन्हा तिथेच गेल्यावर मांडलेली पुस्तकं विस्कटलेली असण्याची शक्यता जास्त आहे. अस्ताव्यस्त पडलेली पुस्तकं मांडली जाणार नाहीत. म्हणजेच मांडलेली पुस्तके ही low entropy आहे आणि अस्ताव्यस्त पुस्तके high entropy.

आता जेव्हा आपण काळाचा विचार करतो तेव्हा हीच गोष्ट कशी लागू होते बघ ! भूतकाळ ही low entropy आहे कारण जे घडून गेलं आहे ते निश्चित आहे. तसेच वर्तमान medium entropy आहे. भविष्यात अनेक शक्यता होऊ शकतात. म्हणून भविष्य high entropy आहे. थोडक्यात काळ low to high entropy जातो. म्हणूनच भविष्याबद्दल आपण काही सांगू शकत नाही.

पण गेल्या काही महिन्यांपासून किंबहुना काही वर्षांपासून माझ्या डोक्यात एका कल्पनेनी वेग धरला. खरं तर मला हे काम अशक्य आहे असं वाटत होतं; पण अचानक माझ्या वाचनात एक लेख आला. काही शास्त्रज्ञांनी मिळून एक असं यंत्र बनविण्याचा प्रयत्न केला होता की, जे तुम्हाला भविष्यात शक्य असणाऱ्या अनेक घटनांपैकी, पण घडण्याची जास्त शक्यता असणाऱ्या घटनांच्या विश्वात घेऊन जाते; परंतु दुर्दैवाने त्या यंत्रातील बिघाडामुळे स्फोट होऊन ते तीनही शास्त्रज्ञ ठार झाले.

यानंतर मी ते यंत्र बनविण्याचा प्रयत्न करू लागलो. हे यंत्र खूप मोठ्या प्रमाणावर ऊर्जा वापरते व कोणतीही गोष्ट low entropy तून high entropy त जाते, आणि high entropy ची भविष्य हीच एक जागा आहे.

भविष्यात जाणं ही गोष्ट १ तास, १ दिवस, फार तर फार १ आठवडा इथपर्यंत ठीक आहे; पण काही महिने अथवा काही वर्षं हा फार मोठा कालावधी आहे. तरीदेखील मी १५ वर्षं पुढे जायचा निर्णय घेतला आहे. त्यानंतर परत येणं शक्य नाही. कारण, एक म्हणेज मी भविष्य काळात म्हणजेच high entropy मध्ये असेन जिथून माघारी फिरणे शक्य नाही. आणि दुसरं म्हणजे मी फार जास्त भौतिक नियम मोडले आहेत. माझा अखेरचा सलाम ! कोणालाही याबद्दल सांगू नकोस; पण हा शोध लावणारा मी पहिला मनुष्य आहे. त्यामुळे मला स्वत:चा अभिमान वाटत आहे ! Bye..."

हे बघून जेम्स गार पडला. त्याला तिथेच झोप लागली.

दुसऱ्या दिवशी त्याने पोलिस स्टेशन मधे जाऊन पाकिटामध्ये काही कागदपत्रे व थोडे पैसे होते असे सांगून ते दाखवले. थोडासा दु:खी; पण आपल्या गुरूंचा अभिमान बाळगून तो बाहेर पडला व पुटपुटला, ''काही गोष्टी अज्ञातच रहाव्यात !''

***

**चि. ओंकार भाटवडेकर** (इ. १० वी)
इ-१००४, ट्रेजर पार्क,
सहकारनगर, पुणे - ९

**ज्ञान प्रबोधिनी**
**बुद्धिमत्ता संवर्धन केंद्र**
(५१४, सदाशिव पेठ, पुणे ४११०३०)

**राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षेसाठी (NTSE)**
**इंटरनेट-व्हिडीओद्वारे मार्गदर्शन**
**(इंग्रजी/सेमी इंग्रजी माध्यम)**

**तपशीलासाठी संपर्क -**
erc@jnanaprabodhini.org
**दूरभाष क्र. ०२०-२४२०७१९३**

## छात्र प्रबोधन दिवाळी अंक प्रकाशनपूर्व नोंदणीसाठी केंद्रे

प्रिय प्रबोधक,

'छात्र प्रबोधन'च्या दिवाळी अंकाची तुम्ही आणि सारा महाराष्ट्र आतुरतेनं वाट बघत असतो. अत्यंत दर्जेदार असा आपला यावर्षीचा दिवाळी अंक तयार होतो आहे. कोणतेही कमिशन न घेता, स्वयंसेवी वृत्तीने महाराष्ट्रभरातले सदस्य अत्यंत मन:पूर्वक आपल्यापर्यंत हा अंक पोहोचावा म्हणून काम करीत असतात.

खालील शहरांत/गावांत छात्र प्रबोधनचे काम करणारे काका-काकू किंवा ताई-दादा आहेत. यावर्षी दिवाळी अंकाच्या जास्तीत जास्त नोंदणीसाठी तुम्हीही त्यांच्याबरोबर सहभागी होणार ना? मराठी अंकाबरोबरच **इंग्रजी**, **ग्रामीण** दिवाळी अंक तसेच महाविद्यालयीन युवक-युवतींसाठी **'युवोन्मेष'** चा दिवाळी अंकही असणार आहेत. संगणकावरही हा अंक वाचता यावा म्हणून **संगणकीय आवृत्ती** निघणार आहे. तर ऐकता यावा म्हणून **बोलका अंक**ही प्रकाशित होणार आहे.

छात्र प्रबोधनचा दिवाळी अंक आपल्या अनेक मित्र-मैत्रिणींना सवलतीच्या दरात नोंदवायला सांगा. तसेच इतरही अंकांची नोंदणी तुमच्यासाठी व तुमच्या परिचयातल्या व्यक्तींसाठी आवर्जून करा. २० सप्टेंबरपूर्वी दिवाळी अंकाचे प्रचार साहित्य खालील केंद्रांवर उपलब्ध असेल. तुम्ही त्याचाही उपयोग करून तुमच्या शाळेत व परिसरात नोंदणी करू शकता. तेव्हा कोणाची वाट न पाहता आपल्या गावातील नोंदणी केंद्राशी स्वत:हून संपर्क करा.

ज्या गावांमध्ये वितरण केंद्रे नाहीत, त्या गावांमधील सभासदांना साध्या पोस्टाने अंक पाठविले जातील. अंक न मिळाल्यास वेगळा अंक पाठवला जाणार नाही. ज्या सभासदांनी रजिस्टर पोस्टाने दिवाळी अंक पाठविण्यासाठी रु. ४०/- जादा भरले आहेत त्यांनाच दिवाळी अंक खात्रीशीरपणे पाठविले जातील.

### विभाग १. बोरीवली (प. मुंबई)

| | | |
|---|---|---|
| बोरीवली | - सौ. सुमिता पांढरे | ☎ ९००४२५३४५१ |
| विलेपार्ले | - श्री. दत्तात्रय जोशी | ☎ ९८६९०६३७७२ |
| बांद्रा | - श्री. मिलिंद चिंदरकर | ☎ ९३२२२४२५६९ |
| गिरगाव | - श्रीमती शिरीषा खरे | ☎ २२-२३८८६९३५ |
| चेंबूर | - कु. मधुरा पंडित | ☎ ९८३३७८८०२२ |
| पालघर | - श्री. तुषार राऊत | ☎ ९८६०२०३१०० |

### विभाग २. डोंबिवली (मध्य मुंबई, ठाणे)

| | | |
|---|---|---|
| ठाणे | - सौ. सुप्रिया बर्वे | ☎ ०२२-२५३६४३६४ |
| डोंबिवली | - सौ. स्मिता चावरे | ☎ ९९३०१४५२११ |
| कल्याण | - सौ. स्मिता मनोरे | ☎ २६९२०९४८७७८ |
| अंबरनाथ | - सौ. अश्विनी कुलकर्णी | ☎ २५१-२६०१४११ |
| बदलापूर | - श्री. चिंतामणी उगले | ☎ ९४२३०८९७७४ |

### विभाग ३. अलिबाग (रायगड-१)

| | | |
|---|---|---|
| अलिबाग | - श्री.राम जोशी | ☎ ९४२०८३५६५० |
| नागाव | - सौ. स्नेहा जोशी | ☎ २१४१-२४५६६१ |
| नागोठणे | - सौ. सुलभा गोखले | ☎ २१९४-२७७९०३ |
| मुरुड | - सौ. दीपाली जोशी | ☎ २१४४-२७४४३९ |
| महाड | - श्री. डी. एस्. सावंत | ☎ ९८२२६२६९३२ |

### विभाग ४. रसायनी (रायगड -२, नवी मुंबई )

| | | |
|---|---|---|
| रसायनी | - सौ.शुभदा कोकीळ | ☎ ९८८१९०३६७३ |
| सानपाडा | - सौ. अपर्णा कानडे | ☎ २२-२७६११७७७ |
| वाशी | - सौ. विजयालक्ष्मी पाटगावकर | ☎ २२-२७८०१९६८ |

### विभाग ५. रत्नागिरी (रत्नागिरी, सिंधुदुर्ग )

| | | |
|---|---|---|
| रत्नागिरी | - सौ. प्रतिभा प्रभुदेसाई | ☎ २३५२-२२२९५३ |
| पावस | - शीतल सामंत | ☎ ९४२११३९५३० |
| चिपळूण | - श्री. प्रसाद काणे | ☎ ९४२२४३०९०० |
| देवरुख | - श्री. प्रसाद वैद्य | ☎ ९४२०१५५३३३ |
| लांजा | - डॉ. अशोक शहाणे | ☎ ९४२११८९२४७ |
| राजापूर | - श्री. संजय कुलकर्णी | ☎ ९४२१२२९७५७ |
| खेड | - सौ. नम्रता दामले | ☎ ९४२२४३३९४९ |
| कुडाळ | - श्री. उमेश सामंत | ☎ ९४२२९६३५१७ |
| सावंतवाडी | - सौ. वंदना करंबेळकर | ☎ ९८५०४७३०१२ |
| कणकवली | - श्री. औदुंबर भागवत | ☎ ९४२११४७५१३ |

गतवर्षी वितरण केंद्र असलेल्या खालील गावांमध्ये सभासदांची संख्या वाढल्यास स्थानिक व्यक्तींच्या माध्यमातून तिथे वितरण केंद्र सुरू होईल. त्यासाठी त्या त्या गावातील सभासदांनी सभासद वाढीसाठी प्रयत्न करावेत.

**खोपोली, पणजी, साखळी, कोल्हापूर, जेऊर, कन्नड, भुसावळ, गेवराई, वसमतनगर, पूर्णा, जिंतूर, नांदेड, अकोट, वाशिम, उमरखेड, सुरत, बंगलोर**



प्रा.-डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, इंग्लंड

### विभाग ६. फोंडा (गोवा)

| | | |
|---|---|---|
| फोंडा | - श्री. मोहन आमशेकर | ☎ ९४२२०५८८७३ |
| मडगाव | - सौ. विनया शिंक्रे | ☎ ९४२३८२०३३२ |
| वास्को | - सौ. दिपा गावकर | ☎ ९८५०३९१४१३ |

### विभाग ७. इचलकरंजी (कोल्हापूर)

| | | |
|---|---|---|
| इचलकरंजी | - श्री.विनायक गद्रे | ☎ ९८८१५९००१८ |
| कुरुंदवाड | - श्री. गोपाळ जोशी | ☎ ९८५०९६४८१९ |
| हुपरी | - सौ. सुधा सांगवडेकर | ☎ ९०२८८५२०५२ |
| महागाव | - श्री. सुभाष सुतार | ☎ ९०९६७१२८१३ |

### विभाग ८. सांगली

| | | |
|---|---|---|
| सांगली | - श्री. शैलेंद्र केळकर | ☎ ९४२२६१६०५८ |
| तासगाव | - सौ. वैशाली गोंदिल | ☎ ९४२१०४८५३६ |
| ३२ शिराळे | - श्री. नाथाराव हसबनीस | ☎ २३४५-२७११८६ |
| कडेगाव | - डॉ. मकरंद बर्वे | ☎ २३४७-२४२१०८ |
| मिरज | - डॉ. श्रीकांत कुलकर्णी | ☎ ९३७२२२३४८७ |
| इस्लामपूर | - सौ. स्वाती कुलकर्णी | ☎ २३४२-२२१९६१ |

### विभाग ९. सातारा

| | | |
|---|---|---|
| सातारा | - श्री. रवी बेडेकर | ☎ ९४२२६००४५८ |
| कोरेगाव | - डॉ. मिलिंद शहा | ☎ ९८२२०२३२०८ |
| कराड | - श्री.दत्तात्रय कुलकर्णी | ☎ २१६४-२२२५०५ |
| खंडाळा | - श्री. अ. ल. फाळके | ☎ ९८९०६०९६३१ |
| पाटण | - श्री. दत्तात्रय नांगरे | ☎ २३७२-२८६८५८ |
| खटाव वडूज | - सौ. पूनम शिंदे | ☎ ९९७५५९९८५१ |

### विभाग १०. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| सोलापूर | - ज्ञान प्रबोधिनी | ☎ ९६८९९९९२०० |
| पंढरपूर | - श्री. दीपक इरकल | ☎ ९४२३३२८९६२ |
| मोहोळ | - श्री. बापूसाहेब दळवे | ☎ ९८५०३६३४८८ |

### विभाग ११. कर्जत (अहमदनगर)

| | | |
|---|---|---|
| नगर | - सौ. स्नेहल धर्माधिकारी | ☎ ९४२२०८४६१३ |
| संगमनेर | - श्री. अशोक भारंबे | ☎ २४२५-२२२६६२ |
| कोपरगाव | - डॉ. अंजली फडके | ☎ ९३२५९५०१२१ |
| शिर्डी | - डॉ. प्रबोध जोशी | ☎ ९४२१५५८४६६ |
| कर्जत | - श्री. गजानन चावरे | ☎ २४८९-२२२९१२ |
| राशीन | - श्री. बाळासाहेब गदादे | ☎ २४८९-२२३००१ |
| पारनेर | - सौ. सविता रेपाळे | ☎ ९९२२२२७११८ |

### विभाग १२. उ. महाराष्ट्र

| | | |
|---|---|---|
| नाशिक | - श्री. अनिल दंडगव्हाळ | ☎ ९४२२२४८२६४ |
| शिरपूर | - श्री. रजनीकांत सोनार | ☎ ९८८१२६४०५० |
| दोंडाईचा | - श्री. सुभाष जैन | ☎ ९८२३४१६८४४ |
| जळगाव | - श्री. अनिल भोळे | ☎ ९४२०६६२७१४ |
| चोपडा | - श्री. सुधाकर केंगे | ☎ ९४२३९१५५२९ |
| चाळीसगाव | - डॉ. मुकुंद करंबेळकर | ☎ ९८२२२६३२७९ |
| नंदूरबार | - डॉ. वैशाली काणे | ☎ ९४२३९८०२९६ |

### विभाग १३. मराठवाडा

| | | |
|---|---|---|
| जालना | - श्री. विजय देशमुख | ☎ ९४२३४५७६५५ |
| बीड | - श्री. कैलास लिंगे | ☎ ९८८१४५१३५७ |
| अंबाजोगाई | - ज्ञान प्रबोधिनी | ☎ ९९६०४०३१४४ |
| धाराशिव | - श्री. बालाजी माळी | ☎ ९४०३३९११०६ |
| हराळी | - ज्ञान प्रबोधिनी | ☎ २४७५-२६०१०२ |
| औरंगाबाद | - चि. शुभम जोशी | ☎ ९७६५०७९४५६ |
| परभणी | - श्री. प्रताप देशपांडे | ☎ ९४०४९७४६१९ |
| सेलू | - श्री.. भालचंद्र गांजापूरकर | ☎ ९८८१५२५७३५ |

### विभाग १४. विदर्भ

| | | |
|---|---|---|
| अकोला | - श्री. भूषण बापट | ☎ ९८५०३८६४९४ |
| यवतमाळ | - सौ. बागेश्री सहस्रबुद्धे | ☎ ९३७२६११७३३ |
| अमरावती | - श्री. प्रदीप व्यवहारे | ☎ ९८६०६७४७७२ |
| नागपूर | - श्री. अजय पत्की | ☎ ९४२२१०४८२१ |
| चंद्रपूर | - श्री. मुकुंद घरोटे | ☎ ९२२६२५२७८१ |

### विभाग १५. पुणे

| | | |
|---|---|---|
| पुणे शहर | - छात्र प्रबोधन मुख्य केंद्र | ☎ २०-२४२०७१७४ |
| निगडी | - ज्ञा.प्र. नवनगर विद्यालय | ☎ २०-२७६५४३८० |
| चिखली | - श्री. गौतम इंगळे | ☎ ९७३०२३७३८८ |
| साळुंब्रे | - ग्राम प्रबोधिनी विद्यालय | ☎ २११४-२२३३७१ |
| शिवापूर | - संजय तागडे | ☎ २०-२४३८४०१३ |
| वालचंदनगर | - श्री. चंद्रकांत जोशी | ☎ २११८-२५३११४ |
| इंदापूर | - श्री. तुषार रंजनकर | ☎ ९४२२३२९६१६ |
| चाकण | - डॉ. अविनाश अरगडे | ☎ ९४२३५७१५५२ |
| बारामती | - मयुरीताई कानिटकर | ☎ ९४२३५८४३२४ |

### महाराष्ट्राबाहेरील अन्य केंद्रे

| | | |
|---|---|---|
| बेळगाव | - ऋचा कुलकर्णी | ☎ ०९४४८३४०११३ |

खालील गावांमध्ये वितरण केंद्रे सुरू करण्यासाठी स्थानिक केंद्रप्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारणारे हवे आहेत. आपल्या गावात केंद्र सुरू करण्यासाठी सभासदांनी पुढाकार घ्यावा.

**मुलुंड, अंधेरी, देवरुख, गुहागर, गडहिंग्लज, जयसिंगपूर, मालेगाव, धुळे, बुलढाणा**

# सिंहावलोकन अकराव्या वर्षाचे

**सौर आश्विन शके १९३२ ते सौर श्रावण शके १९३३ (इसवी सन २०१०-२०११)**

**मासिकाची वाटचाल –** यावर्षी मराठी, इंग्रजी व ग्रामीण असे कुमारांसाठी ३ दिवाळी अंक तर महाविद्यालयीन युवक-युवतींसाठी 'युवोन्मेष' दिवाळी अंक प्रकाशित करण्यात आला. चारही अंकांची एकत्रित सी.डी.ही यावर्षी प्रकाशित करण्यात आली. त्याचबरोबर 'बोलके छात्र प्रबोधन' ही दिवाळी अंकांवर आधारित ऑडिओ सी.डी.ही प्रकाशित केली गेली. महाराष्ट्र व गोव्यातील १०८ गावांमधल्या ३५,००० विद्यार्थ्यांपर्यंत 'छात्र प्रबोधन' पोहोचले. इतिहास विशेषांक (अंक ८), नेहमीची परंपरा राखून मुलांच्या साहित्याचा विशेषांक (अंक ११) हे विशेषांक प्रकाशित झाले. मुलांच्या अंकाचे संपादक मंडळ यावर्षी अकरावीतल्या मुलींचे होते.

**आढावा : संख्यात्मक सारणी (वर्षभरात येऊन गेलेले एकूण साहित्य)**

| | | |
|---|---|---|
| कथा - २० | कृतिपर-विज्ञान/प्रकल्प- ५ | चित्रपट परिचय - १ |
| कविता - २४ | व्यक्तिपरिचय- ७ | लेखमाला - ६ (एकूण लेख- २७) |
| ललित - २० | संस्थापरिचय - ५ | स्फुटं - २८ |
| माहितीपर - १८ | भटकंती - ३ | **लेखक/कवी/चित्रकार - १३८** |
| कृतिपर-कला - १६ | वाचलेच पाहिजे असे काही - ३ | **विद्यार्थी लेखक/कवी/चित्रकार-२२** |


## वर्षभरातील अंकांतील लेखांची सूची

गेल्या वर्षभरातील लेखांची सूची खाली दिलेली आहे. लेखाआधीचा क्रमांक तो लेख त्या वर्षीच्या कोणत्या अंकात आहे, हे दर्शवितो. लेखक/कवींची नावे त्या त्या लेखनप्रकारानंतर दिली आहेत.

*** कथा :** १. नवे काही उमजले २. फिरुनी नवी जन्मेन मी, डड्डू, रस्त्यावरच्या नाताळची गोष्ट, श्रीभद्र, तन्मयीची सुट्टी, भूक ३. प्रत्येकाची इच्छा ४, ५. पाच'अं'ची अक्कलहुशारी-पूर्वार्ध व उत्तरार्ध ६. उरलेला खेळा, वॉर्म अप ७. पाखराची वैखरी, घोरवडेश्वरावर काय घडलं? ८. आईशमनची पारध करणारा पीटर माल्किन (पुन: प्रकाशित), पुराणे गाती वसुंधरेची महती ९. रस्ता १०. सदाशिवाचे अग्निकांड




वर्ष ११ अंक १, सौर आश्विन



वर्ष ११ अंक २, सौर कार्तिक (दीपावली विशेषांक)



वर्ष ११ अंक ३, सौर अग्रहायण



वर्ष ११ अंक ४, सौर पौष



प्रायोजक - मिनीलेक (इंडिया) पिरंगुट, पुणे

**लेखक :** *लीला दीक्षित, नीलिमा करमरकर, शंतनू पांडे, सुनंदा महाजन, सुधा रिसबुड, मीना वांगीकर, जयश्री काटीकर, मेधा इनामदार, मनीषा जोशी, हरिहर आठलेकर, कविता मेहेंदळे, म. वि. कोल्हटकर, ईशान पुणेकर, निनाद बेडेकर, आर्या जोशी, स्वाती राजे, वसुधा पंडित*


✻ **कविता :** १. झेपावण्यासाठी २. बालमित्र, आपल्या हाती, हल्ला, पाण्याची शाळा, नभाहुनही मोठे माझे भान, विठाबाई, समुद्र ३. कृतज्ञता गीत, साथी-सोबती ४. आनंदाच्या गाठी-भेटी, पाखरांच्या ओठी ५. मैत्री, केवळ तुझ्यामुळे ६. प्रार्थना ७. पुस्तक, निसर्ग सांगतो मला ८. इतिहासाचे मनन करूया ९. गणित, शब्दांचे लेणे १०. ही प्रगती?, आजीसंगे...
**कवी :** *आश्लेषा महाजन, इंद्रजित भालेराव, प्रवीण दवणे, मुकुंदराज कुलकर्णी, अरुण म्हात्रे, दत्ता हलसगीकर, रेणू पाचपोर, सुनंदा कवठेकर, संजीव तागडे, एकनाथ आव्हाड, दुर्गेश सोनार, अनुराधा नातू, नीरज पाचपोर, मनीषा जोशी, विनय अपसिंगकर, शरद कुलकर्णी, रमेश कोटस्थाने*

✻ **ललित :** २. पहिली प्रसिद्धी, गोदावरीचा गाव, प्रिय ऋचास, पॅडल मार ! मी आहे, प्राचार्य शिवाजीराव आणि मी ३. पुस्तकजत्रा, नाथमंदिरातील दिवस ४. पोहण्याची गोष्ट, पालघरचा हुतात्मा ५. अंधाराचे डोळे ६. माझी कुऱ्हाड लोखंडाची, चिनूच्या बाई ७. चैत्र, काटेझरीचा शिवा, यास्नया पल्याना, वासुदेव माझे नाव (पुन: प्रकाशित), ८. साक्षीदार १०. पाऊस माझ्या घनातला, याला 'जेवण' ऐसे नाव!, माझा सायकल प्रवास
**लेखक :** *मल्हार अरणकल्ले, डॉ. यशवंत पाठक, लीला दीक्षित, अमृता सुभाष, यु. म. पठाण, निर्मला मठमती, मुकुंदराज कुलकर्णी, श्रीरंग गोखले, उमाकांत कामत, शिल्पा कुलकर्णी, स्नेहा शिनखेडे, मुबारक शेख, डॉ. राहुल मराठे, अनघा भट-बेहेरे , डॉ. रामचंद्र देखणे, जयश्री काटीकर, दत्ता हलसगीकर, डॉ. संगीता बर्वे, शिवराज पिंपुडे*


✻ **एकांकिका :** १. हिरवा 'ई' (लाईव्ह), ८. नातं की कर्तव्य **लेखक :** *प्रसाद सांडभोर, राहुल कोकीळ*
✻ **गंध मोहवी काव्याचा :** ६. शाळेतले 'ते' दिवस, ८. इतिहासाचे मंगल 'गान'
**लेखिका :** *नीलिमा गुंडी, शैलजा देशमुख*
✻ **माहितीपर :** ३-४. पर्यटन आणि विज्ञान भाग १ व २, ४. हिवाळी भाजीपाला, टू जी स्पेक्ट्रम घोटाळा ५. संगीत खांबांमधील भौतिकशास्त्र, २०११ मधील ग्रहणे, साहित्यसंमेलन - मराठी भाषेचा उत्सव ६. फिबोनॅस्सी शृंखला आणि सुवर्ण गुणोत्तर ७. क्विडिच आपल्या मैदानात, काळा पैसा, जीवसृष्टीतील स्वसंरक्षण ८. इतिहासाचे अवजड ओझे, उत्खननातून इतिहासाकडे, इतिहासात दडले भविष्य, प्रतापगडाचे शिवतांडव, शाहिरी परंपरा, जतन इतिहासाचे ९. माहिती अधिकार अधिनियम




**वर्ष ११ अंक ५, सौर माघ**



**वर्ष ११ अंक ६, सौर फाल्गुन**



**वर्ष ११ अंक ७, सौर चैत्र**
**वासंतिक विशेषांक**



**वर्ष ११ अंक ८, सौर वैशाख**
**इतिहास विशेषांक**

**लेखक :** *डॉ. अनिल लचके, डॉ. कांचनगंगा गंधे, प्रवीण वडनेरे, डॉ. वर्षा जोशी, डॉ. प्रकाश तुपे मिलिंद जोशी, अमेय कुलकर्णी, डॉ. उज्ज्वला बर्वे, अरविंद परांजपे, डॉ. मानसी राजाध्यक्ष, सुहासिनी देशपांडे, डॉ. प्रमोद जोगळेकर, संतोष भणगे, मोहन शेटे, शाहीर शोगेश, अभिजित बेल्हेकर, विवेक वेलणकर*

*** कृतिपर : (१) कला –** २. फुलपाखरू, छान किती दिसते, झुकु झुकु चाले आगीन गाडी, काचेचा दिवा, फोटोरोल जनरेटर, सुतळीचे शिंकाळे, उठावदार फ्रेम, स्टीलची फुलदाणी ३. त्रिमिती भेटकार्ड ४. चित्रांसाठीची वेगवेगळी माध्यमे, वेस्टपासून बेस्ट ५. एक्स-रे फिल्मचे चल सुशोभन ६. एम्बॉसिंग फ्रेम ७. रेशीम नातं कागदाशी

**लेखक :** *शुभा रुद्र, मधुकर पालकर, संपदा साळवी, उल्हास टुमणे, माधुरी अरणकल्ले, चंद्रशेखर हडप, श्रीरंग गोखले, मालती आगटे*

**(२) विज्ञान –** २. डोळे उघडून शिका गड्यांनो ५. विज्ञान दिनानिमित्त प्रश्न **लेखक :** *श्रीरंग गोखले*

**(३) प्रकल्प –** १. (गणिती) प्रयोगातून प्रकल्पाकडे, ८. प्रकल्पातून खरे शिक्षण ९. आपल्या आसपासची जैवविविधता

**लेखक :** *नचिकेत नित्सुरे, शिवराज पिंपुडे, अमेय कुलकर्णी*

**(४) सर्वांगीण विकास –** २. अभ्यास देशस्थितीचा समतोल चालो ८. नाट्याविष्कारातून इतिहास जगा

**लेखक :** *विवेक कुलकर्णी, सुचेता भालेराव*

*** व्यक्तिपरिचय :** २. गावा, मातीच्या संस्कारानं घडवलं (मा. गृहमंत्री आर. आर. पाटील) ३. सावरपाडा एक्सप्रेस (ॲथलिट कविता राऊत) ५. डॉ. मेघनाद साहा-एक भविष्यदर्शी वैज्ञानिक ६. नायटिंगेल ऑफ इंडिया-सरोजिनी नायडू ७. बहुगुणी संशोधिका रोझलिंड फ्रँकलिन ९. आव्हानांना सामोरं जाताना (डॉ. संजीव गलांडे)*

**लेखक :** *इंद्रजित भालेराव, सुरेंद्र पाटसकर, शैलजा देशमुख, सुहासिनी देशपांडे, अमेय कुलकर्णी* (*– स्वलिखित)

*** संस्था/वास्तू परिचय :** ५. मराठी विज्ञान परिषद ६. भारतीय उष्णदेशीय मौसम विज्ञान संस्था ७. आगीशी दोन हात ९. कथा एका संग्रहालयाची (राजा दिनकर केळकर संग्रहालय)

**लेखक :** *विनय र. र., डॉ. अरविंद कुलकर्णी, प्रशांत रणपिसे, डॉ. मृणाल धोंगडे*

*** भटकंती :** २. भारतीय शीत वाळवंट, ९. माझी 'नून' ची स्वप्नपूर्ती

**लेखक :** *अमृता जोगळेकर, चेतन केतकर*


*** वाचलेच पाहिजे असे काही :** १. शिखरावरून, २. आई समजून घेताना ९. व्हाय नॉट आय?

**लेखिका :** *आर्या जोशी, शैलजा देशमुख, अंजली नानल*

*** मानसिक विकसन :** १. मोगरा फुलला **लेखिका :** *अनघा लवळेकर*



वर्ष ११ अंक ९, सौर ज्येष्ठ



वर्ष ११ अंक १०, सौर आषाढ



वर्ष ११ अंक ११, सौर श्रावण

**आगमी अंक**
**प्रकल्प विशेषांक**

वर्ष ११ अंक १२, सौर भाद्रपद



प्रायोजक - श्री. अच्युत श्रीपाद दामले, सांगली

* **लेखमाला**
  - **अभ्यासातील अडथळे –** १.काही विषयांची भीती वाटते ५. घाबरता कशाला? परीक्षा एक संधी! ६. परीक्षेआधीची तंत्रे **लेखक :** *महेन्द्र सेठिया*
  - **विकास बौद्धिक क्षमतांचा** (लेखांक १७ ते २१)– १, ३. वेन आकृती भाग १ व २, ४. सांकेतिक भाषा ५. तर्क व अनुमान ६. बौद्धिक क्षमतेचे स्वरूप ***लेखक :*** *- अमर परांजपे, डॉ. उषा खिरे*
  - **कर्मयोगिनी भगिनी निवेदिता –** (१ ते १० ) २. भगिनी निवेदिता ३. भगिनी निवेदिता आणि स्वामी विवेकानंद यांची लंडनमधील भेट ४. हिंदू तन-मन समजून घेण्यासाठी निवेदितांचे प्रयत्न, ५. ब्रम्हचारिणी व्रताची दीक्षा ६. स्वामी विवेकानंदांच्या सहवासात ज्ञानग्रहण ७. भगिनी निवेदितांची शाळा ८. निवेदितांच्या कार्याचा वाढता व्याप ९. एका हृद्य मैत्रीची गोष्ट १०. निवेदिता आणि भारतीय स्वातंत्र्य **लेखिका :** *डॉ. सुरुचि पांडे*
  - **कलानंदाच्या वाटेवर –** २. बोलगाण्यातून मिळाली जीवनसृष्टी, चित्रपट माध्यमाशी पहिली ओळख, माझी प्रेरणा, अविस्मरणीय मैफली, गाण्यासाठी जन्म आपुला

    **लेखक :** *दुर्गेश सोनार, विभावरी देशपांडे, देवदत्त पाडेकर, शांभवी वझे, संजीव अभ्यंकर*
  - **तारे नवक्षितिजावरचे –** २. सप्तसुरांच्या साथीने, संशोधनाचं क्षितिज खुणावतं आहे, आणि पाण्याशी दोस्ती झाली, अभ्यास आणि आसनं यांचा 'योग' होतो तेव्हा

    **लेखक :** *प्रथमेश लघाटे, हंसा पद्मनाभन, मंथन चाळके, प्राची शेंबेकर*
  - **प्रकल्पांची कमाल, शिकण्यातली धमाल –** (१ व २ ) ९. नवनव्या उचापती-अर्थात प्रकल्प करूया १०. विविध प्रकारचे प्रकल्प करूया ! **लेखक :** *विवेक पोंक्षे, डॉ. नलिनी गुजराथी*

* **निवेदने :** १. दिवाळी अंक वितरण, केंद्रप्रमुख पत्ते २. स्पर्धा-सृजनाला पंख नवे, तुम्हीच संपादक व्हा ४. अभिष्टचिंतन (दत्ता श्री. टोळ) ६. स्वरभास्कराला आदरांजली (भारतरत्न पं. भीमसेन जोशी), कवितांचा संग्रह स्पर्धा ७. चला सर्जनशील बनूया, ग्रामीण मेळावे, विद्यार्थी विशेषांक आवाहन, सौर माघ अंकातील पाच शास्त्रज्ञांचा परिचय, स्पर्धा निर्णय - तुम्हीच संपादक व्हा, सृजनाला पंख नवे, ८. साहस सहली

* **स्फुटं : जरा हसूया** २, **व्यंगचित्र** २, ७ **कोडी** २, ५, ६, ८ **संकीर्ण –** १. सुभाषिते ८. झलक लिपींची

  **माहितीपर –** ५. आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र वर्ष, आंतरराष्ट्रीय वनवर्ष ७. लिबियातील राजकीय भूकंप ८. युद्धांचे प्रकार - त्याचे अर्थ **लेखक :** *प्रवीण वडनेरे, नीलिमा वैशंपायन*

* **मलपृष्ठ पद्य –** १. निवेदितांचे स्वप्न जयस्वी ३. हिंदू ऐक्याची ध्वजा ४. हे वीर विवेकानंद ५. उरात अमुच्या ६. तुझ्या आर्यभूमीत ७. खळखळ धावत ८. शतकातुनि ९. असति का ऐसे कुणी? १०. तनूमनात...११. हाक तुझी परि... **कवी :** *अनघा लवळेकर, संगीता बर्वे, विश्ननाथ गुर्जर, स्वर्णलता भिशीकर, हेमाताई अंतरकर*

* **पानाखालच्या ओळी–विषयानुसार :** ३. मन ४. स्वातंत्र्य/देशप्रेम ८. कालरेषा

* **चित्रकार :** *शिवाजी तुपे, दत्तात्रेय पाडेकर, अनंत कुलकर्णी, निलेश जाधव, मिलिंद मुळीक, पुंडलिक वझे, गिरीश सहस्रबुद्धे, सचिन जोशी, दीपक संकपाळ, भास्कर सगर, अभय पुरंदरे, मुकुंद भालेराव, तेजस्वी भुरके, ऋजुता घाटे, साहिल उपळेकर, सौरभ उपळेकर, अमोल भोसले, किशोर पगारे, मधुरा फडणीस, नेहा कदम, गुरुप्रसाद गांधी, हर्षदा सावंत सचिन पाटील, अन्वर हुसेन*


शोधा... www.tigersintheforest.co.uk

*** मुलामुलींचे साहित्य –** १. आदिवासींची झोपडी, नवरस (मराठी प्रकल्प) २. सीडींची लॅम्पशेड ४. परमवीर चक्राचा पहिला मानकरी ११. मिशन पत्रव्यवहार, सूड, अज्ञात (कथा), मोबाईल, विज्ञानयुग, आयुष्य हे असंच जगायचं असतं (कविता), इको सिटी (माहितीपर), वेंकटरामन् रामकृष्णन्...(व्यक्तिपरिचय), आदर्श सामाजिक प्रकल्प....(संस्थापरिचय)

**विद्यार्थी लेखक** : *कु. ऋचा लऊळकर, कु. निकिता भुतडा, कु. जीवनविद्या जोशी, कु. सविता गोखले, कु. शिवांगी मांडके, चि. शुभम खांदवे, कु.अंकिता आपटे, कु. सानिका समेळ, चि. ओंकार भाटवडेकर, कु. नयन जगताप, चि. देवव्रत शिरोळकर, कु. गौतमी सडेकर, चि. श्रेयस जोगळेकर, कु. कल्याणी मराठे, कु. आकांक्षा घाटोळ*

*** चित्रकार :** *कु. सानिका समेळ, कु. पूर्वा गुर्जर, चि. तुषार कुलकर्णी, कु. इरावती आनंद, कु. संयुक्ता रावत, कु.मधुरा रेडीज*

---

## 'छात्र प्रबोधन'च्या स्पर्धा व उपक्रमांचा संक्षिप्त आढावा

*** बोलके छात्र प्रबोधन –** अंध मित्रांना दिवाळी अंकाची मजा घेता यावी त्यांना तो ऐकायला मिळावा याबाबत चर्चा होऊन बोलक्या अंकाच्या सीडीची कल्पना सुचली व ती प्रत्यक्षातही आली. प्रत्येक मान्यवर कलाकारांबरोबरच ४ शाळेतील विद्यार्थ्यांनीही प्रत्यक्ष रेकॉर्डिंग मध्ये भाग घेतला. यामध्ये अंध मित्रांचाही सहभाग होता. (वृत्त अंक ३ मध्ये)

*** सृजनाला पंख नवे स्पर्धा (सादरीकरण स्पर्धा)–** छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकावर आधारित शालेय विद्यार्थ्यांसाठी 'सृजनाला पंख नवे' ही सादरीकरणाची सांघिक स्पर्धा आयोजित करण्यात आली. स्पर्धेत पुण्यातील व पुण्याबाहेरच्या एकूण ५ शाळांमधील सुमारे १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. (वृत्त अंक ७ मध्ये)

**'तुम्हीच संपादक व्हा!' राज्यस्तरीय हस्तलिखित स्पर्धा –** 'छात्र प्रबोधन'तर्फे राज्यस्तरीय हस्तलिखित स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. दोन गटात ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. किशोर गटात १६ शाळांनी भाग घेतला होता. कुमार गटामध्ये १० शाळांनी भाग घेतला होता. प्रत्येक गटात ४ क्रमांक काढून त्यांना पुस्तक रूपाने बक्षिसे पाठविण्यात आली.(वृत्त अंक ७ मध्ये)

*** ग्रामीण मेळावे –** छात्र प्रबोधनच्या विविध केंद्रांमार्फत ग्रामीण भागात २१ ठिकाणी (ग्रामीण दिवाळी अंकावर आधारित) मेळावे घेण्यात आले. या मेळाव्यांमधून इयत्ता सातवी ते नववीतील सुमारे १२०० विद्यार्थी सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांचा वाचन वेग मोजणे, अंकातील साहित्यावर आधारित सादरीकरण - कवितेला चाल लावणे, अभिवाचन, मुलाखत घेणे, नाट्यरूपांतर इ. तसेच वाचन कौशल्याविषयी मार्गदर्शन करणे, अंकातील लेखावर चर्चा करणे, लेखक तुमच्या भेटीला या अंतर्गत एखाद्या लेखकाशी तेथील मुलांचा दूरभाष/भ्रमणभाषद्वारा प्रत्यक्ष संवाद घडवून आणणे असे या मेळाव्याचे स्वरूप होते.

*** प्रकाशने –** 'छात्र प्रबोधन'तर्फे या वर्षी खालील पुस्तके प्रसिद्ध करण्यात आली.

- **नवीन आवृत्ती –** प्रबोधन गीते, हसत खेळत बुद्धिविकास भाग १, कल्पक बनूया
- **पुनर्मुद्रण –** बुद्धिवैभव, Green Messages , Enhancement of Intelligence Through Play, Glory of Intelligence, गंध मोहवी काव्याचा भाग १-२, व्यक्तिविकासासाठी विद्याव्रत, आम्ही असे घडलो.

याशिवाय सांगली, डोंबिवली व बोरीवली येथील ज्ञान प्रबोधिनीची विस्तार केंद्रे जोमाने नवनवीन उपक्रमांची भरधाव घोडदौड करत आहेत. त्या ठिकाणी विद्यार्थी व प्रौढ सदस्यांसाठी अनेक नियमित व प्रासंगिक उपक्रम होतात.

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० श्रावण, शके १९३३, १ ऑगस्ट २०११ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे २ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे ३० येथून प्रसिद्ध केले.



कै. दिनेश बळवंत बापट स्मरणार्थ। **प्रायोजक - श्री. बळवंत गंगाधर बापट, अंधेरी**

दिवाळी म्हणजे फटाके-फराळ, किल्ला-आकाशकंदील आणि

## छात्र प्रबोधनचे ६ दिवाळी अंक

(मराठी, इंग्रजी, ग्रामीण, युवोन्मेष, बोलके छात्र प्रबोधन, संगणकीय अंक)

कथा, कविता, ललित लेख, माहितीपर लेख, खेळ, विज्ञान प्रयोग,
प्रेरणादायी लेखमाला यांचा मस्त खजिना
या दिवाळीच्या सुट्टीत लुटायचाय ना? त्यासाठी तय्यार ना?

सभासदांना त्यांचा मराठी दिवाळी अंक जवळच्या केंद्रावरून मिळेलच !
पण या खजिन्यातल्या इतर अंकांची प्रकाशनपूर्व नोंदणीही करायला विसरायचं नाहीये हं !

– दिवाळी विशेषांकांची प्रकाशनपूर्व नोंदणी किंमत –

खास कुमारांसाठी

मराठी ₹ ४०

इंग्रजी ₹ ४०

ग्रामीण ₹ ३०

युवकांसाठी

युवोन्मेष ₹ ४०


बोलके छात्र प्रबोधन (Audio CD) ₹ ५०

चारही अंकांचा एकत्रित संगणकीय (Pdf) अंक ₹ ५०

प्रकाशनपूर्व नोंदणीसाठी आपल्या घराजवळील केंद्रावर जाऊन (केंद्रांची यादी पान क्र. २६–२७ वर)
आजच आपली व आपल्या मित्र–मैत्रिणी, चुलत–मामे–आते –मावस भाऊ–बहिणी
यांची नोंदणी पक्की करा.

प्रकाशनपूर्व सवलतीतील नोंदणीचा अंतिम दिनांक २० सप्टेंबर २०११


## गंमत उंदीर–मांजराची



(हस्तलिखित – महाराष्ट्र माझा, आपटे प्रशाला, पुणे)

**सौर श्रावण, शके १९३३/ ऑगस्ट २०११, पंजीकृत नियतकालिक** (Registered Newspaper)
**पंजीकरण क्रमांक** (RNI NO.) MAHMAR/2000/5636 **घोषणापत्र क्रमांक :** (PHM/SR/201/VIII/2001)
L-2/RNP/PNW/M/94/2009-2011, **Posted at S.P. Post Office On 1st of Every Month.**
**तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्रमांक** License to post without prepayment of postage LWP No. L-172

# हाक तुझी परि मनी वसे

तंत्रज्ञानी नवे सहस्रक केवळ वैभव सांगतसे
अध्यात्मासह विज्ञानाची हाक तुझी परि मनी वसे ।। ध्रु. ।।

पार्थासम एकाग्र साधना, उग्र विरागाचीच अर्चना
संन्यस्तांच्या संघटनेला सेवेची दृढमूल प्रेरणा
शतशतकांचे द्रष्टे चिंतन तुझ्या अंतरी उमलतसे... ।। १ ।।

सप्तसिंधुच्या पार घुमविली तू हिंदूंची विजयघोषणा
ज्ञानकर्मयोगातुन दिधली वीरत्वासह अपार करुणा
जे जे शोषित ते नारायण, पूज्य मानले देव जसे... ।। २ ।।

आज पश्चिमा वित्तबळाने पदोपदी दुनिया झुकवी
स्वत्वाला विसरला देश हा गुलामीच त्याला सुखवी
वज्राघाती वेदान्ताची शास्त्रसंपदा हवी असे... ।। ३ ।।

राष्ट्र दीनवाणे झालेले, धर्मतेज नाही उरले
वनराजाचे गोत्र विसरता, करुण केसरी भेदरले
या भ्रांतीतुन जागे होण्या शब्द तुझे आसूड जसे... ।। ४ ।।

**सौर दिनदर्शिका शके १९३३**

| ऑगस्ट २०११ | | श्रावण / भाद्रपद |
|---|---|---|
| सो. | 1 | १० |
| मं. | 2 | ११ |
| बु. | 3 | १२ |
| गु. | 4 | १३ |
| शु. | 5 | १४ |
| श. | 6 | १५ |
| र. | 7 | १६ |
| सो. | 8 | १७ |
| मं. | 9 | १८ |
| बु. | 10 | १९ |
| गु. | 11 | २० |
| शु. | 12 | २१ |
| श. | 13 | २२ |
| र. | 14 | २३ |
| सो. | 15 | २४ |
| मं. | 16 | २५ |
| बु. | 17 | २६ |
| गु. | 18 | २७ |
| शु. | 19 | २८ |
| श. | 20 | २९ |
| र. | 21 | ३० |
| सो. | 22 | ३१ |
| मं. | 23 | भा.१ |
| बु. | 24 | २ |
| गु. | 25 | ३ |
| शु. | 26 | ४ |
| श. | 27 | ५ |
| र. | 28 | ६ |
| सो. | 29 | ७ |
| मं. | 30 | ८ |
| बु. | 31 | ९ |

| वरील गीत 'छात्र प्रबोधन'च्या संकेतस्थळावर जरूर ऐका. | पत्त्यामध्ये वर्गणीचा कालावधी 11-11 / August 11 असल्यास तुमची वर्गणी संपली आहे, ती त्वरीत भरावी. पत्त्यामध्ये चुका असल्यास तातडीने कळवा. |
|---|---|

**संपर्क पत्ता :**
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
www.chhatraprabodhan.org
jpchhatra@rediffmail.com

**या अंकाची किंमत :** ₹ १५/-
**वार्षिक वर्गणी :** ₹ १८०/-
**प्रकाशन दिनांक :**
सौर १० श्रावण, शके १९३३
१ ऑगस्ट २०११

**प्रिय पोस्टमन,**

हा अंक तुम्ही आमच्या लाडक्या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना!

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति -